नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक १८६ * * अमरावती * गुरुवार, दिनांक ८ जानेवारी २०२६ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## झारखंडमध्ये हत्तीने ६ लोकांना तुडवून मारले

■ **वृत्तसंस्था, चाईबासा, दि. ७ :**
झारखंडमधील चाईबासा येथे जंगली हत्तीने मंगळवारी रात्री 6 लोकांना चिरडून ठार केले. हे सर्वजण आपापल्या घरात झोपले होते. या हत्तीने गेल्या ७ दिवसांत परिसरातील १६ लोकांचा बळी घेतला आहे.

वन विभागाला त्याला पकडण्यात यश आलेले नाही. अशा परिस्थितीत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनंत अंबानींच्या वन्यजीव संरक्षण संस्था ह्यवनताराह्न कडे मदत मागितली आहे. चाईबासा जिल्ह्यातील नोवामुंडी प्रखंडातील जेटिया पंचायतच्या भरबरिया गावात हत्तीने ज्या ६ लोकांना चिरडून ठार केले, ते एकाच घरात झोपले होते. रात्री सर्वजण झोपले होते, तेव्हा अचानक हत्तीने घरावर हल्ला केला.

## देवाभाऊंचा मोठेपणा




महाराष्ट्राचे तरुण तुर्क आणि तडफदार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसजी उर्फ देवाभाऊ यांनी अगदी देवाच्या तोंडात शोभेल असे विधान केलेले आहे. त्यांनी तसे विधान करून आपल्या मनाचा मोठेपणा दाखवला आहे त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केलेच पाहिजे.

भारतीय जनता पक्षाचे नवनिर्वाचित प्रदेश अध्यक्ष परवा लातूरला गेले होते. एखाद्या शहरात आपल्या पक्षाचा अध्यक्ष आला आणि तो पहिल्यांदा आला तर त्याच्या आगमनाचे जंगी स्वागत केले जाते. त्यासाठी फार मोठा समारंभ होतो कार्यकर्त्यांना हुरुप येतो आणि मग पक्षाचे सर्वाधिकारी बनल्यावर कधीकधी समोरच्या श्रोत्यांचा हुरूप आणि उत्साह पाहून एखादा वेडावाकडा शब्द चुकून बाहेर पडतो. आजकाल वेड्यावाकड्या शब्दांनाही सरळ करण्याची जादुई किमया अनेकजण करतात मात्र, बरेचदा त्या उलटही होते. रवींद्र चव्हाण यांनी बोलण्याच्या ओघात लातूर मधून आता विलासरावांच्या आठवणी पुसल्या जातील असे विधान केले होते. समोरच्या कार्यकर्त्यांचा हुरूप पाहून अति उत्साहाच्या भरात ते बोलून गेले असतील. परंतु विलासराव देशमुख यांच्या पक्ष विरहित मैत्रीचा धागा सर्व पक्षांना बांधून ठेवणारा होता. विलासरावांची ह्रदयाला भिडणारी भाषणे, त्यांचा प्रसन्न आणि हसतमुख चेहरा त्यांची सभा जिंकण्याची हातोटी तसेच सर्व पक्षातील त्यांचे मैत्रीचे बंध महाराष्ट्राला चिरपरिचित आहेत. तसे पाहिले तर विलासराव राजकारणातील ऐन तारुण्यात या पृथ्वीतलावरून गेले. त्या काळात विरोधी पक्षात असलेल्या गोपीनाथराव मुंडे आणि विलासराव यांचा तात्विक विरोध कितीही असला तरीही ते दोघे पक्के जिवाभावाचे मित्र होते, ही बाब देवेंद्र फडणवीस उर्फ आपले देवाभाऊ यांना चांगलीच ठाऊक आहे. विलासरावांबद्दल लातूरच्या जनतेला किती जिव्हाळा वाटतो, त्यांच्यावर तळागाळातील जनतेपासून ते मोठमोठ्या अनेक व्यक्तींचा किती विश्वास आणि प्रेम होते आणि आजही टिकून आहे हे आम्ही सांगण्याची गरज नाही. तुम्ही कधीही फोन करा स्वतः फोन उचलून बोलणारा मुख्यमंत्री म्हणून विलासराव प्रख्यात होते. कितीही गंभीर विषय असला तरी त्याचे निवारण करण्यासाठी विलासराव सदैव तत्पर असत. आपले सध्याचे मुख्यमंत्री त्यांच्या विरोधी पक्षातील आहेत पण देवेंद्रजींनी ज्या शब्दांमध्ये विलासरावांच्या व्यक्तिमत्वाचे वर्णन केलेले आहे ते निश्चितच देवेंद्रजी यांचा स्वभाव आणि त्यांच्या सध्याच्या निवडणुकीतील पदाला साजेसेच आहे. सध्या महापालिकांच्या निवडणुकीचे दिवस आहेत. अशा वेळी कोणतीही विधाने करताना अतिशय सावधानता बाळगली पाहिजे. रवींद्र चव्हाण यांनीही एकूण परिस्थिती पाहून दिलगिरी व्यक्त केलेली आहे, 'ते मोठे नेते होते विलासराव मुख्यमंत्री म्हणून काम करत असताना त्यांचे काम खूपच चांगले होते' असे सांगून रवींद्र चव्हाण यांनी आपले शब्द जवळजवळ मागे घेतलेले आहेत आणि विलासरावांची स्तुती सुद्धा केलेली आहे. अशावेळी मुख्यमंत्री म्हणून देवेंद्रजींनी जी भूमिका घेतलेली आहे, ती निश्चितच मनाचा मोठेपणा दाखवणारी आहे हे खरे आहे. महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा वेगळ्या वळणावर जाऊ नये म्हणून देवेंद्रजींनी तत्काळ वक्तव्य करून ज्या पद्धतीने दिलगिरी व्यक्त केली. त्यामुळेच विलासरवांच्या चाहतांची नाराजी आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनाही सावरण्याचे कार्य त्यांनी केलेले आहे. पक्षापक्षांत विचारांची लढाई असली तरी कोणत्याही पक्षाचा नेता राज्याला विकासाच्या पक्षाकडेच घेऊन जाईल यात शंका असण्याचे कारण नाही. त्यामुळेच काँग्रेस पक्षानेही आता या विधानाचे भांडवल न करता मुख्यमंत्र्यांनी जी भाषा वापरली आहे, त्याचे स्वागत केले पाहिजे. मुख्यमंत्र्यांनीही या वादावर पडदा टाकून चांगलेच काम केले आहे, असेच म्हणावे लागेल.

mahasagarngp@gmail.com
Mob. No. 9922970023

### विलासराव महाराष्ट्राचे महत्त्वाचे नेतृत्व : चव्हाणांचे वक्तव्य अनावधानाने

# लातुरात डॅमेज कंट्रोल

■ **वृत्तसंस्था, लातूर, दि. ७ :**
आमची राजकीय लढाई काँग्रेस पक्षाशी असली, तरी दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचा मोलाचा वाटा आहे, अशा नेत्यांमध्ये विलासरावांचे नाव प्रमुख आहे, हे सांगताना मला कोणताही संकोच वाटत नाही, अशा शब्दांत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लातूरमध्ये भावनिक साद घातली.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी विलासरावांबद्दल केलेल्या वादग्रस्त विधानावरून निर्माण झालेला तणाव निवळण्यासाठी देवेंद्र फडणवीस यांनी लातुरात 'डॅमेज कंट्रोल' करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

महाराष्ट्राचे दिवंगत माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या आठवणी लातूरमधून पुसल्या जातील, असे वादग्रस्त वक्तव्य भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केल्यानंतर राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली. मुद्दा अधिक तापण्याची शक्यता पाहता रवींद्र चव्हाण यांची आपल्या विधानावरून दिलगिरी देखील व्यक्त केली. मात्र, रवींद्र चव्हाण यांच्या निषेधार्थ विविध संघटनांच्या वतीने बुधवारी लातूर बंदची हाक देण्यात आली होती.

लातूरमध्ये आयोजित एका सभेत बोलताना फडणवीस म्हणाले, लातूरला वेगळी ओळख देणारे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख हे नाव पक्षाच्या पलिकडे आहे. महाराष्ट्राचा जडणघडणीत मोलाचा वाटा आहे म्हणून आपण ज्या नेत्यांचा आदर करतो, त्यातील प्रमुख नाव विलासराव देशमुख यांचे आहे, असे सांगताना मला कुठलाही संकोच नाही.



रवींद्र चव्हाण यांनी विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या विधानावरही स्पष्टीकरण दिले. दोन दिवसांपूर्वी काही गोंधळ झाला. कदाचित त्यांचे शब्द चुकीच्या पद्धतीने गेले असतील, त्याबाबत त्यांनी दिलगिरीही व्यक्त केली आहे. मी जाहीरपणे सांगतो काँग्रेस पक्षाशी आमची लढाई असली, तरी विलासराव देशमुखांबद्दल आम्हाला नितांत आदर आहे. ते या महाराष्ट्रातील महत्त्वाचे नेतृत्व आहेत, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी लातुरात डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला.

लातूर ज्यांची जन्मभूमी नव्हती, पण त्यांची कर्मभूमी होती, असे आमचे नेते गोपीनाथराव मुंडे यांचेही स्मरण या निमित्ताने लातुरकरांसोबत केले पाहिजे. या भूमिमध्ये नेतृत्व तयार करण्याचा एक गुण आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणालेत.

लातूरच्या पाणीप्रश्नावर बोलताना फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला आणि भविष्यातील विकासाचा रोडमॅप मांडला. आज लातुरला रेल्वेने पाणी आणावे लागतंय. पुढील काळात लातुरमध्ये परत कधीही रेल्वेने पाणी आणावे लागू नये यादृष्टीने काम करायचे असल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले.

### भाजप-एमआयएम युतीचा
## अखेर घटस्फोट

**देवेंद्र फडणवीसांच्या नाराजीनंतर निर्णय**
**आमदार भारसाखळेंना कारणे दाखवा नोटीस**

■ **महासागर प्रतिनिधी अकोला, दि. ७ :**



एमआयएमशी हातमिळवणी करणे अकोटमधील भाजप नेत्यांना चांगलेच महागात पडले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही युती 'तत्वशून्य' असल्याचे सांगत कडक कारवाईचे संकेत दिल्यानंतर, अवघ्या काही तासांतच अकोटमधील भाजप-एमआयएम युती तुटली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत भाजप नेतृत्व आता स्थानिक आमदार आणि पदाधिकाऱ्यांना 'कारण दाखवा' नोटीस बजावणार आहे.

अकोटमध्ये एमआयएमला सोबत घेऊन 'अकोट विकास मंच' स्थापन करण्याच्या निर्णयात आघाडीवर असलेले भाजपचे आमदार प्रकाश भारसाकळे आता पक्षाच्या रडारवर आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार आमदार प्रकाश भारसाकळे, भाजपचे अकोट शहराध्यक्ष, निवडणूक प्रभारी, गटनेते आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांना पक्षाकडून 'कारण दाखवा' नोटीस पाठवली जाणार आहे. राज्यातील आणि केंद्रातील भाजप नेतृत्वाने या स्थानिक प्रयोगाबद्दल अत्यंत तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली असून, दोषींवर कडक कारवाई होण्याची शक्यता आहे.

## आयोगाने नाकारले भाजपचे प्रचार गीत

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महानगरपालिका निवडणुकांच्या निर्णायक टप्प्यावर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडून तयार करण्यात आलेले प्रचार गीत राज्य निवडणूक आयोगाने नाकारल्याची माहिती आहे.



मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपने विशेष प्रचार गीत तयार केले होते. मतदारांपर्यंत थेट पोहोचण्यासाठी आणि भावनिक अपील निर्माण करण्यासाठी संगीत, शब्द आणि प्रसिद्ध कलाकारांचा वापर करण्याची रणनीती भाजपने आखली होती. त्यानुसार हे गीत तयार करण्यात आले होते आणि प्रचाराच्या अंतिम टप्प्यात ते मोठ्या प्रमाणावर वापरण्याचा पक्षाचा मानस होता. मात्र, प्रचाराला गती मिळण्याआधीच या गीतावर निवडणूक आयोगाने आक्षेप घेतला आणि प्रचारासाठी वापरण्यास नकार दिला.

या प्रचार गीतामध्ये भगवा हा शब्द वापरण्यात आल्याने निवडणूक आयोगाने आक्षेप नोंदवला आहे. निवडणूक आचारसंहितेच्या निकषांनुसार धार्मिक किंवा भावनिक स्वरूपाचे शब्दप्रयोग प्रचारात आक्षेपार्ह ठरू शकतात, असा ठपका ठेवत आयोगाने हे गीत नाकारले असल्याची माहिती आहे. आयोगाच्या मते, अशा शब्दप्रयोगामुळे मतदारांवर विशिष्ट भावनिक किंवा धार्मिक प्रभाव पडू शकतो.

## ठाकरेंच्या संयुक्त मुलाखतीत फडणवीस, शिंदे टार्गेटवर

**मुंबईचे प्रश्न सोडवण्यासाठी मुंबईत जन्म घ्यावा लागतो : राज ठाकरे**
**राज्यकर्त्यांचे प्रेम राज्यावर असावे, सत्तेवर नाही : उद्धव ठाकरे**

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
सत्तेवर असणाऱ्यांना स्वतःचे घर भरायचे आहे, त्यांना जनतेचे काही देणेघेणे नाही. सध्या सुरू असलेली निवडणूक सत्ता आणि पैशाच्या जोरावर लढली जात आहे. ज्या-ज्या ठिकाणी बिनविरोध निवडणुका झाल्या, तिथे सारे जण पैशाच्या जोरावर निवडून आले आहेत. यांना मुंबई महाराष्ट्रापासून तोडायची आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी वाटेल तसे राजकारण केले आहे. अशा भाषेत उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी संयुक्त मुलाखतीतून फडणवीस, शिंदे यांच्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या.

दोन्ही ठाकरे बंधू २० वर्षांनंतर एकत्र आले आणि सध्या राज्यात सुरू असलेल्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खा. संजय राऊत आणि अभिनेते दिग्दर्शक महेश मांजरेकर यांनी उद्धव ठाकरे व राज ठाकरे यांची संयुक्त मुलाखत घेतली. निवडणूक हा मुख्य विषय होताच, पण मुंबई आणि मुंबईचे राजकारण, समाजकारण यावर दोघेही भरभरून बोलले. राऊत यांनी राजकारणाशी संबंधित प्रश्न विचारले, तर मांजरेकर यांनी सामाजिक प्रश्नांचा भडीमार केला.

राज ठाकरे यांनी सध्याच्या सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करताना, भाजप आणि त्यांचे मित्रपक्ष ज्या पद्धतीने राजकारण करत आहेत, त्यातून मुंबईला महाराष्ट्रापासून वेगळे करण्याचा सूक्ष्म पण ठरवून केलेला प्रयत्न स्पष्टपणे दिसतो. आज राज्य चालवणारे खरे निर्णयकर्ते नाहीत, तर खुर्चीवर बसवलेले प्रतिनिधी आहेत. त्यामुळे हे लोक, जनतेच्या मनाचे नाही, तर ज्यांनी खुर्ची दिली त्या धन्याचे ऐकतात, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.


मुंबईसारख्या महानगराच्या समस्या समजून घ्यायच्या असतील, तर त्या शहराशी नातं असावं लागतं. मुंबईकरांना काय हवे आहे, काय नको आहे, हे मुंबईत जन्मलेला आणि इथे वाढलेला माणूसच समजू शकतो, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

उद्धव ठाकरे यांनी सध्याच्या सत्ताधाऱ्यांवर टीका करताना सांगितले की, आजचे राज्यकर्ते खुर्चीवर प्रेम करणारे असून त्यांना राज्य, जनता किंवा विकासाशी काहीही देणेघेणे नाही. सत्ता मिळवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी पैशाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असून सत्ता जणू विकत घेतली जात आहे.

खरे राज्यकर्ते तेच असतात ज्यांचे प्रेम राज्यावर असते; सत्तेवर नसते. मात्र आजच्या सत्ताधाऱ्यांचे प्रेम केवळ सत्तेपुरते मर्यादित आहे. आज राज्य चालवणारे अनेक लोक मुंबईकर नाहीत. त्यामुळे मुंबईचे महत्त्वाचे प्रश्न, येथील जीवनशैली, स्थानिक समस्या आणि संवेदनशीलता त्यांना कधीही नीट समजणार नाही.

## शिंदेंच्या उमेदवारावर प्राणघातक हल्ला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार हाजी सालीन कुरेशी यांच्यावर प्रचारादरम्यान अज्ञाताने जीवघेणा हल्ला केला. हल्लेखोराने कुरेशी यांच्या पोटात थेट चाकू भोसकला.



हाजी सालीन कुरेशी हे बांद्रा येथील ज्ञानेश्वर नगर परिसरात प्रचार करत होते. यावेळी मतदारांच्या भेटीगाठी घेत असतानाच अज्ञात इसमाने त्यांच्यावर हल्ला चढवला. आरोपीने त्यांच्या पोटात चाकू खुपसला.

## नगरसेवकांचे काँग्रेसकडून निलंबन

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने अंबरनाथ नगरपालिकेतील घडामोडींवर कठोर भूमिका घेत पक्षशिस्तीचा मोठा निर्णय घेतला आहे. अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाच्या चिन्हावर उमेदवार लढवून निवडून आले असतानाही भाजपच्या सदस्यांसोबत गटबंधन केल्याचा ठपका ठेवत प्रदेश काँग्रेसने अंबरनाथ ब्लॉक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रदीप पाटील यांना कारणे दाखवा नोटीस देत काँग्रेस पक्षातून निलंबित करण्याचा निर्णय कळवण्यात आला आहे.

अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अधिकृतपणे निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत काँग्रेसच्या चिन्हावर लढलेले बारा नगरसेवक निवडून आले. मात्र, पक्षाच्या प्रदेश कार्यालयास कोणतीही माहिती न देता या नगरपालिकेत भारतीय जनता पक्षाच्या सदस्यांसोबत गटबंधन करण्यात आल्याचे प्रसारमाध्यमांतून समोर आले. ही बाब अत्यंत गंभीर, चुकीची आणि पक्षशिस्तीचा भंग करणारी असल्याचे प्रदेश काँग्रेसने स्पष्ट शब्दांत नमूद केले आहे.

### ही युती नाही.. स्वतःहून समर्थन

अंबरनाथमधील भाजप नेते व माजी आमदार नरेंद्र पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे. अंबरनाथ-बदलापूरमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गटाचे स्वतंत्र निवडणूक लढवली आहे. त्यात सत्ता भाजपच्या हाती आली. अंबरनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तेजश्री करंजुळे सुशिक्षित असून त्यांना काँग्रेसने समर्थन दिले आहे, ही युती नाही, असे स्पष्टीकरण नरेंद्र पवार यांनी दिले आहे. नरेंद्र पवार म्हणाले, काँग्रेस आणि इतर घटकांनी भाजपाला पाठिंबा दिला आहे, अंबरनाथमध्ये विकास होण्याच्या दृष्टिकोनातून विकासाची काम जी रखडले आहेत त्याला गती देण्यासाठी त्यांनी भाजपला समर्थन दिल्याचा हा प्रकार आहे.



## दादाच महाराष्ट्राचे आका... भाजपा आ. लांडगेंचा आरोप

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. ७ :**
अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका असून आधी त्यांनी स्वतःच्या मुलाचा पराक्रम पाहावा आणि नंतर आमच्यावर टीका करावी, असा टोला भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी लगावला आहे. अजित पवार हे स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपसोबत आले आहेत, त्यांनी आम्हाला शिकवू नये, अशी खरमरीत टीका लांडगे यांनी केली आहे. अजित पवारांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर लांडगे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उत्तर दिले आहे.



आमदार महेश लांडगे म्हणाले, आधी स्वतःच्या लोकांचे पराक्रम पाहा आणि ते स्वतः आका आहेत, हे त्यांनी जाहीर करावे. ते मला पिंपरी चिंचवडचा आका म्हणत आहेत, मुळात अजित पवार हेच महाराष्ट्राचे आका आहेत.

महेश लांडगे म्हणाले, सध्या अजित पवारांचा अहंकार बोलत आहे, ते नैराश्यात आहेत. स्वतःचा भ्रष्टाचार लपवण्यासाठी भाजपमध्ये आलेल्या अजित पवारांनी आमच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करू नयेत. आरोप सिद्ध करायचे असतील तर मी, पालिका प्रशासन आणि अजितदादांनी सामोरासमोर बसावे.

## तुला कुलाब्यात राहायचंय की नाही? नार्वेकरांवर धमकावल्याचा आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यावर कुलाबा वॉर्ड क्र. २२६ मधील उमेदवार तेजल पवार आणि त्यांचे पती दीपक पवार यांनी दडपशाहीचा गंभीर आरोप केला आहे.



नार्वेकर यांनी दीपक पवार यांना मी बोलावल्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनाही यावं लागतं, तुला कुलाब्यात राहायचंय की नाही, ते तू ठरव, अशी थेट धमकी दिल्याचे पवार दाम्पत्याने पत्रकार परिषदेत सांगितले.

उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी आधी लाखो, नंतर कोट्यवधी रुपयांची ऑफर दिली गेली, असा दावाही त्यांनी केला. बुधवारी 'शिवसेना भवन' येथे ठाकरे गटाचे खासदार अरविंद सावंत यांच्या उपस्थितीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत पवार दाम्पत्याने हा थरारक घटनाक्रम मांडला.

तेजल पवार यांनी ३० डिसेंबरला आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता. यानंतर राहुल नार्वेकर यांनी दीपक पवार यांना आपल्या गाडीतून कार्यालयात नेले आणि उमेदवारी मागे घेण्यासाठी दबाव टाकण्यास सुरुवात केली.

दीपक पवार यांनी घडलेला प्रसंग सांगताना म्हटले, राहुल नार्वेकर मला म्हणाले, 'मी कुठल्या पदावर आहे तुला माहिती नाही का? मी बोलावल्यावर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्रीही येतात.' त्यांनी मला 'राजू' नावाच्या कार्यकर्त्याचे उदाहरण दिले. राजूने निवडणूक लढवण्याची घोषणा करताच त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल करण्यात आले होते. 'तुला कुलाब्यात राहायचंय की नाही, हे तूच ठरव,' अशी धमकी त्यांनी दिली.

### उमेदवारांना धमकावल्याचे आरोप हास्यास्पद

कुलाबा वॉर्डातील उमेदवारी अर्जावरून निर्माण झालेल्या वादानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट करत विरोधकांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. हा केवळ राजकीयदृष्ट्या प्रेरित 'फेक नॅरेटिव्ह' सेट करण्याचा प्रयत्न आहे, असे म्हणत त्यांनी ठाकरे गटावर पलटवार केला आहे. ज्या महिलेने दबाव टाकल्याचा आरोप केला आहे, तिला आपण कधी पाहिले नाही किंवा भेटलोही नाही. उमेदवारी मागे घेण्यासाठी ५-५ कोटी रुपये मागण्याचे ह्या लोकांनी प्रयत्न केले होते, असा आरोपही राहुल नार्वेकर यांनी केला.



विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी उमेदवारी अर्ज भरण्याच्या प्रक्रियेदरम्यान पोलिसांवर दबाव टाकर उमेदवारांवर दमदाटी केल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. या प्रकरणावरून शिवसेना खासदार संजय राऊत आणि अरविंद सावंत यांनी नार्वेकरांवर गंभीर आरोप केले होते, तर उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या निलंबनाची मागणी केली आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ जानेवारीला संपली असताना ७ जानेवारीला हे आरोप का केले जात आहेत, असा सवाल नार्वेकरांनी विचारला. उमेदवारी मागे घेण्याची तारीख उलटून ५ दिवस झाले आहेत. या पाच दिवसांत हे लोक झोपले होते का? की काही विशेष प्लॅनिंग सुरू होते? हे सर्व राजकारण डोळ्यासमोर ठेवून रचलेले नाटक आहे, राहुल नार्वेकर म्हणाले.



# असली अभद्र युती खपवून घेणार नाही!



## अकोट अंबरनाथमधील प्रयोगावर देवेंद्र फडणवीस संतापले

### कठोर कारवाईचे संकेत

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**

अकोट आणि अंबरनाथ नगरपरिषदांमध्ये सत्तेसाठी भाजपने अनुक्रमे एमआयएम आणि काँग्रेससोबतच्या हातमिळवणीमुळे राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

या 'विचित्र' समीकरणांवर आता खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत कडक भूमिका घेतली आहे. काँग्रेस आणि एमआयएमसोबत कोणतीही युती चालणार नाही. अशी युती म्हणजे अनुशासनहीनता आहे. ही युती तोडावीच लागेल. ही युती करणाऱ्यांवर कारवाई होईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

राज्यात आगामी महानगरपालिका निवडणुकीचे वारे वाहत असतानाच, अकोट आणि अंबरनाथमध्ये भाजपने सत्तेसाठी केलेल्या स्थानिक आघाड्यांनी सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. अकोटमध्ये 'एमआयएम' आणि अंबरनाथमध्ये 'काँग्रेस'सोबत भाजपने संसार थाटल्याने विरोधकांनी भाजपला लक्ष्य केले आहे. मात्र, या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक नेत्यांवर प्रचंड नाराजी व्यक्त केली असून संबंधितांवर कारवाईचा इशारा दिला आहे.

अकोटमध्ये भाजपने एमआयएमसोबत तर अंबरनाथमध्ये काँग्रेसशी युती झाल्याने देवेंद्र फडणवीसांनी स्थानिक नेत्यांवर प्रचंड नाराज झाले आहेत. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, स्थानिक पातळीवर काँग्रेस किंवा एमआयएमसोबत कोणतीही युती खपवून घेतली जाणार नाही. ही युती तत्वशून्य आहे आणि ती होऊच शकत नाही. अशी युती म्हणजे अनुशासनहीनता आहे आणि ती तोडावीच लागेल.

स्थानिक नेत्यांनी जरी हा निर्णय घेतला असला, तरी तो पूर्णपणे चुकीचा आहे. ज्याने कोणी ही युती घडवून आणली असेल, त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल. यासंदर्भात आम्ही आदेश दिले आहेत.

**अकोटमध्ये 'अजब' विकास मंच!**

अकोट नगरपरिषदेत सत्तेचा आकडा गाठण्यासाठी भाजपने 'अकोट विकास मंच' स्थापन केला आहे. या आघाडीचे स्वरूप पाहून राजकीय विश्लेषकही चक्रावून गेले आहेत. या मंचमध्ये भारतीय जनता पक्ष, एमआयएम, शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (ठाकरे गट), राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), प्रहार जनशक्ती (बच्चू कडू) पक्ष एकत्र आले आहेत. या सर्व पक्षांनी एकत्र येत जिल्हाधिकाऱ्यांकडे या नव्या गटाची नोंदणीही केली आहे.

अकोटमधील घडामोडींप्रमाणेच ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ नगरपरिषदेतही भाजपने वेगळेच राजकीय समीकरण तयार केले आहे. येथे भाजपने थेट काँग्रेससोबत हातमिळवणी करत सत्तेचा मार्ग निवडला आहे. काँग्रेसमुक्त भारतचा नारा देणाऱ्या भाजपकडून काँग्रेससोबत युती होत असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विशेष म्हणजे, या युतीत शिवसेना शिंदे गटाला बाजूला ठेवण्यात आल्याने शिंदे गटासाठी हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे. भाजप आणि काँग्रेस एकत्र येऊन अंबरनाथ नगरपरिषदेत बहुमत स्थापन करणार असल्याचा दावा केला जात आहे.

**विरोधकांच्या हाती कोलीत**

भाजपच्या या स्थानिक प्रयोगांमुळे विरोधकांना आयतेच कोलीत मिळाले आहे. भाजप सत्तेसाठी काहीही करू शकते, हे यातून सिद्ध झाले आहे, अशी टीका विरोधकांकडून होत आहे.

## भाजपची रणनीती बदलणार; राष्ट्रवादीशी संघर्ष



भाजपकडून पुणे महापालिकेत १२५ जागा जिंकण्याचं लक्ष्य जाहीर करण्यात आलं आहे. मात्र, ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीशी जवळीक वाढवत युतीची दिशा बदलल्यामुळे भाजपच्या या महत्त्वाकांक्षी लक्ष्याला धक्का बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सत्तेत एकत्र असतानाही प्रचारात राष्ट्रवादी आणि भाजप आमनेसामने आल्याचं चित्र दिसत असून, याचा थेट परिणाम मतदारांवर होण्याची भीती भाजपच्या गोटात व्यक्त केली जात आहे. सर्व्हेमध्येही भाजपला अपेक्षेपेक्षा कमी प्रतिसाद मिळत असल्याचे संकेत मिळत असल्यामुळे पक्षातील अस्वस्थता वाढली आहे.

पुणे महापालिका निवडणुकीसाठी भाजपकडे २५०० पेक्षा अधिक इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. मात्र, उमेदवारी जाहीर करताना पक्षाने अनेक जुने, निष्ठावंत कार्यकर्ते डावलून नव्या चेहऱ्यांना संधी दिली. याच निर्णयामुळे पक्षात नाराजीचा सूर उमटला. नाराज नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी थेट अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत तिथून उमेदवारी मिळवली आणि निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली. परिणामी भाजपसमोरच भाजपचे माजी नेते उभे ठाकल्याने मिशन १२५ धोक्यात येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घडामोडींची गंभीर दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे. प्रचारासाठी पुण्यात आले असताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी पक्षातील काही वरिष्ठ नेत्यांना चांगलेच फटकारल्याची चर्चा आहे. सोमवारी रात्री कात्रज येथे झालेल्या जाहीर सभेत फडणवीस आणि केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी अजित पवार यांचे नाव न घेता अप्रत्यक्षपणे टीका केली. सत्तेत असूनही राष्ट्रवादीकडून होत असलेल्या हालचालींमुळे भाजपला होणाऱ्या नुकसानीचा सूर या भाषणांतून स्पष्ट दिसून आला.

मुख्यमंत्री, चंद्रकांत पाटील आणि मुरलीधर मोहोळ हे तिघेही नेते विमानतळावर पोहोचले आणि बंद दाराआड महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याची माहिती आहे.

## निवडणुकांनंतर सुप्रिया सुळे केंद्रात तर रोहित पवार राज्यात मंत्री?



■ **पुणे :** राज्यातील महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांचे निकाल लागताच महाराष्ट्राला एक वेगळेच चित्र पाहायला मिळेल. निवडणूक संपल्यानंतर सुप्रिया सुळे केंद्रात मंत्री होतील, तर रोहित पवार राज्याच्या मंत्रिमंडळात दिसतील. पवार कुटुंब कधीच वेगळे नव्हते आणि नाहीत, हे माझे भविष्य लवकरच खरे ठरेल, असा खळबळजनक दावा ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी केला आहे.

अजित पवार यांच्यावर अत्यंत गंभीर आरोप करताना लक्ष्मण हाके यांनी पुण्याच्या राजकारणाकडे लक्ष वेधले. ते म्हणाले, एकीकडे मुखी फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घ्यायचे आणि दुसरीकडे तिकीट वाटताना बोडके, आंदेकर, नायर यांसारख्या गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या लोकांना जवळ करायचे, हेच अजित पवारांचे राजकारण आहे. पुण्यात सत्ता आल्यावर अजित पवार पुन्हा पहाटे बाहेर पडतील, मोकळे भूखंड शोधतील आणि ते ५०० रुपयांत हडप करतील. पवार हे भ्रष्टाचाराचे महामेरू असून ते जनतेचे सेवक नसून अदानींसारखे केवळ एक 'उद्योजक' असल्याचा टोलाही त्यांनी लगावला.

शरद पवार यांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करताना हाके म्हणाले, शरद पवार वरवर भाजपसोबत जाणार नाही असे सांगत असले, तरी त्यांचे खायचे दात वेगळे आणि दाखवायचे वेगळे आहेत. ते राज्यातील भाजप नेत्यांना किंमत देत नाहीत, त्यांचे थेट 'कनेक्शन' पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्याशी आहे. सध्या भाजपची शिंदे गटाशी आणि अजित पवारांशी युती आहे. अजित पवारांचे शरद पवारांशी आतून साटेलोटे आहे. शरद पवार काँग्रेस आणि ठाकरेंसोबत आहेत. ठाकरे आणि मनसेची जवळीक आहे, तर काँग्रेस वंचितसोबत बोलणी करतेय. सर्वच पक्ष एकमेकांसोबत निवडणूक लढवत आहेत. यात सामान्य कार्यकर्ता मात्र बाजूला फेकला गेला असून, आगामी निवडणुका केवळ पैसा आणि गुंडगिरीच्या जोरावर लढल्या जातील, अशी भीती लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केली.

## संभाजीनगरात अजित पवार गटाच्या कार्यालयाला आग लावण्याचा प्रयत्न

■ **छत्रपती संभाजीनगर :** शहरातील वार्ड क्रमांक १६ मधील कैलास नगर परिसरात असलेल्या राष्ट्रवादीच्या पक्ष कार्यालयात अज्ञात व्यक्तीने आग लावण्याचा प्रयत्न केल्याची घटना उघडकीस आली आहे. ही घटना आज पहाटे घडली असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही.

कैलास नगर येथील राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या पक्ष कार्यालयाच्या बाहेर उभारलेल्या मंडपाला अज्ञात व्यक्तीने आग लावण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी परिसरात काही कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. त्यांनी वेळीच प्रसंगावधान राखत आग वाढण्यापूर्वीच ती आटोक्यात आणली. त्यामुळे मोठा अनर्थ टळला. जर आग भडकली असती, तर कार्यालयातील साहित्य, प्रचार सामग्री तसेच आजूबाजूच्या वस्त्यांनाही धोका निर्माण झाला असता, अशी चर्चा स्थानिकांमध्ये होत आहे. कार्यालयाला लक्ष्य करण्यात आल्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## इम्तियाज जलील यांच्या वाहनावर हल्ला

■ **वृत्तसंस्था, छत्रपती संभाजीनगर, दि. ७ :**

छत्रपती संभाजीनगर शहरात राजकीय वातावरण चांगलेच तापले असून एमआयएम पक्षाचे नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांच्या गाडीवर हल्ला झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या पक्षातीलच काही कार्यकर्त्यांनी हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती पुढे आली आहे.



जलील यांच्या वाहनावर संतप्त कार्यकर्त्यांनी हल्ला केल्यानंतर परिस्थिती तणावपूर्ण बनली. काही वेळातच मोठा जमाव जमा झाला आणि परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची चिन्हे दिसू लागली. जमावाला पांगवण्यासाठी पोलिसांना लाठीचार्ज करावा लागला. या कारवाईनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही, मात्र वाहनाचे नुकसान झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, या प्रकरणानंतर इम्तियाज जलील यांनी पोलिसांसमोर हा हल्ला झाला असून पोलिस काय कारवाई करतात? ते आता पाहणार असल्याचे म्हटले आहे. हल्ला करणाऱ्या गुंडांना पालकमंत्री संजय शिरसाट आणि मंत्री अतुल सावे यांचे सक्षण असल्याचा गंभीर आरोप देखील त्यांनी केला. या हल्ल्याप्रकरणी गुन्हा दाखल होण्याची शक्यता असून पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## राहुल नार्वेकर पॅटर्नविरोधात ८ उमेदवार एकवटले

### निवडणूक आयोगाकडून दखल नाही : विधानसभा अध्यक्षांनाच थेट हायकोर्टात ओढले

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

विधानसभा अध्यक्ष तथा भाजप आमदार राहुल नार्वेकर यांच्याविरोधात निवडणूक प्रक्रियेत थेट हस्तक्षेप आणि अधिकारांच्या गैरवापराचे गंभीर आरोप करत आठ इच्छुक उमेदवारांनी मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. निवडणूक आयोगाने तक्रारीकडे दुर्लक्ष केल्यानंतरच हा मार्ग स्वीकारल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे.

याचिकेनुसार, महापालिका निवडणुकीत राहुल नार्वेकर यांच्या कुटुंबातील एक नव्हे, तब्बल तीन उमेदवार रिंगणात आहेत. याच पार्श्वभूमीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांवर दबाव टाकून प्रतिस्पर्धी इच्छुकांचे उमेदवारी अर्ज स्वीकारू दिले नाहीत, असा आरोप करण्यात आला आहे. याचिकाकर्ते बबन महाडिक, नीरज राठोड, वैशाली गावडे, मेहबूब हुसेन मद्दनवार, परिचय भोईर, मनोज मोरे, रबसाना अहमद शफिक शेख आणि मार्गरेट जी. कोस्टा– या आठ जणांनी प्रभाग क्रमांक २२४ ते २२७ साठी आवश्यक कागदपत्रे व अनामत रक्कम जमा करूनही अर्ज नाकारल्याचा दावा केला आहे.



न्यायालयाने तातडीची सुनावणी घेण्यास नकार देत, योग्य वेळी सुनावणी घेण्यात येईल, असे स्पष्ट केले. तरीही, १५ जानेवारीला मतदान असल्याने तातडीने हस्तक्षेप करून उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली आहे.

याचिकेत आणखी गंभीर आरोप करताना म्हटले आहे की, कुलाबा मतदारसंघातील प्रभाग २२५, २२६ आणि २२७ मधून नार्वेकर यांच्या वहिनी हर्षिता नार्वेकर, भाऊ मकरंद नार्वेकर आणि बहीण गौरी नार्वेकर निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामुळेच घटनात्मक पदाचा गैरवापर करून निवडणूक प्रक्रियेत हस्तक्षेप केला गेला, असा आरोप करण्यात आला आहे.

## मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे पुरस्कार जाहीर

### अकोलकर, वाबळे, पाटील यांची निवड

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

पत्रकार दिनाचे औचित्य साधत मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाच्या वतीने २०२५ या वर्षीच्या उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारांची घोषणा मंगळवारी करण्यात आली आहे. 'कृ. पां. सामक' हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांना जाहीर करण्यात आला आहे.

राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी (वृत्तपत्र ) 'लोकसत्ता' चे प्रतिनिधी अशोक अडसूळ यांची तर वृत्तवाहिनीसाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी 'इंडिया टुडे-आज तक' समूहाचे पुणे ब्युरो चीफ ओमकार वाबळे यांची निवड करण्यात आली आहे. वार्ताहर संघाच्या सदस्यांसाठी असलेला उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार 'ॲग्रोवन'चे बाळासाहेब पाटील यांना जाहीर झाला आहे.

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे आणि सरचिटणीस दीपक भातुसे यांनी आज या पुरस्कारांची घोषणा केली. ज्येष्ठ पत्रकार अभय देशपांडे, प्रकाश सावंत आणि संघाचे सदस्य सचिव सुजित महामुलकर यांच्या निवड समितीने या पत्रकारांच्या नावांची पुरस्कारासाठी केलेली शिफारस संघाच्या कार्यकारिणीने मान्य केली.

यापूर्वी 'कृ. पां. सामक जीवनगौरव पुरस्कार' हा ज्येष्ठ पत्रकार वसंत देशपांडे, विनायक बेटावदकर, विजय वैद्य, दिनू रणदिवे, दिनकर रायकर, प्रकाश जोशी, अजय वैद्य, प्रतिमा जोशी, पंढरीनाथ सावंत यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला आहे. यंदाच्या पुरस्कारांचे लवकरच समारंभपूर्वक वितरण करण्यात येईल, अशी माहिती संघाने दिली आहे.

## डोळ्यांना पट्टी, पायांना सिगारेटचे चटके आणि गळा चिरला

# पैशांच्या वादातून मित्रांकडूनच मित्राचा खून

■ **वृत्तसंस्था, छ. संभाजीनगर, दि. ७ :**

मोबाइल व पैसे घेतल्याच्या संशयातून मित्रांनीच एका मित्राला डोंगरावर नेत गळा चिरून हत्या केली. त्याआधी त्यांनी त्याच्या पायाला सिगारेटचे चटके दिले, डोळ्यांना पट्टी बांधून मारहाण केली. हा प्रकार जटवाडा परिसरातील ऊर्जा भूमी येथील डोंगरात घडला. प्रकरणी सय्यद सिराज अली सय्यद नसेर अली ऊर्फ मोठा सिराज यास अटक केली, तर छावणी ठाण्यात त्याच्यासह छोटा सिराज, जब्बार, कबीर व अन्य एक अशा एकूण ५ जणांवर गुन्हा दाखल केला.





शकील आरेफ शेख (३०, रा. फुलेनगर) असे मृताचे नाव आहे. मृताचा भाऊ सलमान आरेफ शेख याने दिलेल्या माहितीनुसार, गेल्या आठवड्यात आरोपी सिराजने शकील धमकी दिली होती.

हत्या झालेले ठिकाण हे दौलताबाद व छावणी पोलिस या दोघांच्या परिसरात आहे. दौलताबाद पोलिसांच्या पथकाने प्राथमिक बाबींची पूर्तता करून मृतदेह घाटीत नेला. मात्र त्यानंतर गुन्हा दाखलसाठी पोलिसांतील हद्दीचा वाद सुरू झाला. दिवसभर रंगलेल्या या वादानंतर वरिष्ठांच्या आदेशाने छावणी ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मृतदेहाचे डोके ज्या हद्दीत, त्या ठाण्याकडे तपास जातो. शरीराचा जास्त भाग, नाभी, रक्ताचे डाग आणि संघर्षाच्या खुणा ज्या हद्दीत जास्त, तेथेच गुन्हा नोंदवून तपासाचा अंतिम निर्णय घेतात. आठवडाभरापूर्वी आरोपी सिराजने आरेफच्या आईला फोन केल्यापासून त्यांच्यात वादाची ठिणगी पडलेली होती.

तेव्हापासून उर्वरित आरोपींनी त्यास मारण्याची तयारी सुरू केली. ४ जानेवारी रोजी आरोपीने त्यास पार्टीसाठी जटवाडा परिसरात नेले. तेथे नशा केली. त्यानंतर वाद होत त्यांनी आरेफला चटके देत अखेर त्याची गळा चिरून हत्या केली.

# पतंगराव नव्हे रॉकेटराव!



महाराष्ट्रातील राजकारणात जवळपास तीस वर्ष आपल्या कर्तुत्वाचा ठसा उमविणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व असलेले काँग्रेसचे जेष्ठ नेते, महाराष्ट्राचे माजी मंत्री पतंगराव कदम यांची आज ८२ वी जयंती. ८२ वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ८ जानेवारी १९४४ रोजी पतंगराव कदम यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील सोनसळ या गावात एका गरीब कुटुंबात झाला.

त्यांचे चौथी पर्यंतचे शिक्षण गावातल्या शाळेत झाले तर सातवी पर्यंतचे शिक्षण शिरसगाव या गावात झाले. ११ वी पर्यंतचे शिक्षण म्हणजे त्या काळातील मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण त्यांनी कमवा व शिका योजनेअंतर्गत पूर्ण केले. एफ. वाय बी. ए नंतर त्यांनी टीचर्स डिप्लोमा पूर्ण केला व शिक्षक होण्याचे स्वप्न उराशी बांधून पुणे गाठले.

पुण्यातील हडपसर येथे दहा बाय दहाच्या पत्र्याच्या खोलीत राहून त्यांनी गोरगरिबांच्या मुलांना शिकवण्याचे काम सुरू केले. शिक्षक असतानाच गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळावे यासाठी काही तरी करावे असा विचार त्यांच्या मनात येऊ लागला त्यातूनच, भारती विद्यापीठाची मुहूर्तमेढ रोवली गेली.



**श्याम ठाणेदार**
**दौंड. जिल्हा पुणे.**
**९९२२५४६२९५**

बा. ग पवार, वसंतराव म्हेत्रे, महादर सर, नीलाखे सर अशा पाच लोकांना घेऊन त्यांनी १० मे १९६४ रोजी भारती विद्यापीठाची स्थापना केली. त्यावेळी त्यांच्या खिशात अवघे ३८ रुपये होते. हळूहळू भारती विदयापीठाचा विस्तार वाढू लागला. शहराप्रमाणे ग्रामीण भागातही भारती विद्यापीठाच्या पाट्या झळकू लागल्या. भारती विद्यापीठामुळे गोरगरिबांच्या मुलांना इंग्रजीतून शिक्षण मिळू लागले. सर्वसामान्य कुटुंबातील मुले उच्च शिक्षण घेऊ लागली. त्यांनी लावलेल्या भारती विद्यापीठाच्या रोपट्याचे आज वटवृक्ष बनले आहे. के.जी ते पी.जे असे सर्वप्रकारचे शिक्षण आज भारती विद्यापीठातून मिळत आहे. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य महान असेच आहे.

भारती विद्यापीठाचा पसारा सांभाळीत त्यांनी राजकारणातही ठसा उमटविला. १९६८ साली एस टी महामंडळाच्या सदस्यपदी त्यांची निवड झाली. गाव तिथे एस टी ही योजना राबवून त्यांनी गावागावात एस टी पोहचवली. १९८५ साली त्यांनी अपक्ष म्हणून विधानसभेची निवडणूक लढवली. त्यात ते विजयी झाले.

१९९० सालच्या विधानसभा निवडणुकीत त्यांना काँग्रेसने त्यांना तिकीट दिले तेंव्हापासून १९९५ सालचा अपवाद वगळता ते सतत निवडून आले. २०१४ साली मोदी लाटेत अनेक दिग्गज नेत्यांचा पराभव झाला पण त्यांनी आपला गड राखला.

या दरम्यान त्यांनी शिक्षण, सहकार, उद्योग, महसूल, वन या महत्वाच्या खात्याची मंत्रीपदे सांभाळली. इतकी वर्ष मंत्रीपदावर राहूनही त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही यातच त्यांचा कारभार किती पारदर्शक होता, हे दिसून येते. काँग्रेस पक्षावर त्यांची नितांत श्रद्धा होती. सत्ता असो वा नसो काँग्रेस पक्षाशी ते कायम एकनिष्ठ राहिले.

प्रत्येकवेळी मुख्यमंत्र्यांच्या स्पर्धेत त्यांचे नाव कायम चर्चेत असायचे, पण दुर्दैवाने ते मुख्यमंत्री बनू शकले नाही. तरीही त्यांनी याबाबत कधीही जाहीर नाराजी व्यक्त केली नाही. पक्ष सोडण्याचा विचारही त्यांच्या मनात कधी आला नाही. आजच्या आयाराम गयाराम संस्कृतीत पतंगरावांची निष्ठा उठून दिसते.

बेधडक आणि मनमोकळा स्वभाव हे त्यांचे वैशिष्ट्य होते. ओठात एक आणि पोटात एक असे पतंगरावांच्या बाबतीत कधीच झाले नाही. खऱ्याला खरे आणि खोट्याला खोटे म्हणण्याची त्यांची वृत्ती राजकारणात अभावानेच पाहायला मिळते. त्यांचे भाषण म्हणजे पर्वणीच. त्यांच्या भाषणात गावाकडचा रांगडेपणा असायचा. कार्यकर्त्यांचा गराडा कायम त्यांच्यासोबत असायचा. उद्घाटनाच्या कार्यक्रमाला पतंगरावांनाच बोलवायचे असा कार्यकर्त्यांचा आग्रह असायचा.

त्यांच्या कामाचा धडाका देखील जबरदस्त असायचा. आपल्या मतदारसंघात त्यांनी कामाचा डोंगर उभा केला होता. आपल्या मतदारसंघात एमआयडीसी उभारून त्यांनी अनेक उद्योगधंदे आणले. सूत गिरण्या, साखर कारखाने, वाईन पार्क, भारती विद्यापीठ, भारती हॉस्पिटल उभारून मोठ्या प्रमाणात उद्योग निर्मिती केली.

त्यांच्या कामाचा झपाटा इतका असायचा की, एकदा पु. ल. देशपांडे म्हणाले की, हे पतंगराव नव्हेत तर रॉकेटराव आहेत. पतंगराव कदम यांनी सहकार क्षेत्रातही आपला ठसा उमटविला. ९ मार्च २०१८ रोजी पतंगराव कदम यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक असामान्य व्यक्तिमत्व काळाच्या पडदयाआड गेले. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राची मोठी हानी झाली. पतंगराव कदम यांना ८२ व्या जयंतीदिनी विनम्र अभिवादन! ■ ■ ■

# राज्य ग्रंथालय परिषदेची १६ वर्षानंतर बैठक

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**

राज्यातील ग्रंथालय चळवळीला अधिक सक्षम करण्यासाठी नव्याने गठीत करण्यात आलेल्या ग्रंथालय परिषदेची तब्बल १६ वर्षांनी मंत्रालयात बैठक पार पडली. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी या बैठकीत दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होत ग्रंथालय चळवळीला नवे बळ देण्यासाठी सरकार सवोतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही दिली.

राज्य सरकारच्या निर्णयानुसार सुमारे १६ ते १७ वर्षांनंतर राज्य ग्रंथालय परिषद पुन्हा गठीत करण्यात आली आहे. नव्याने गठीत परिषदेची पहिली बैठक आज मंत्रालयात संपन्न झाली. या परिषदेची मागील बैठक २६ मे २००९ रोजी पार पडली होती. त्यानंतर पुन्हा एकदा परिषदेची बैठक घेण्यात आली आहे.आता परिषदेच्या माध्यमातून ग्रंथालय चळवळ सक्षम करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ देण्यात येणार आहे. तसेच ग्रंथालय व्यवस्थापनाच्या सर्वांगीण विकासासाठी ठोस निर्णय घेण्यात येतील, असे पाटील यांनी यावेळी सांगितले.



बैठकीत ग्रंथालय संचालनालयाचे सन २००८-०९ ते २०२४-२५ या कालावधीतील वार्षिक अहवाल मंजुरीसाठी चर्चेला घेण्यात आले. याशिवाय बैठकीत विविध विषयांवरही चर्चा करण्यात आली.

या चर्चेदरम्यान ग्रामीण भागात वाचनसंस्कृती जोपासण्यासाठी सीएसआर निधी किंवा राजाराम मोहनरॉय योजना यांच्या माध्यमातून मोबाईल वाचन व्हॅन खरेदी करून ती गावे, शाळा आणि दुर्गम भागांमध्ये नेऊन वाचन उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला.गाव तिथे ग्रंथालय उपक्रम राबविण्यासाठी ग्रामविकास विभागाशी चर्चा करण्यात येईल, असे पाटील यांनी बैठकीत स्पष्ट केले.

संचनालयातंर्गत राज्य मध्यवर्ती ग्रंथालय आणि सहा विभागीय ग्रंथालयांमध्ये फिरते ग्रंथालय सेवा देणे ही योजना प्रायोगिक तत्त्वावर निर्माण करण्याचा मानस आहे. सार्वजनिक ग्रंथालयाचे नियतकालिक तीन वषानंतर तपासणी करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच ई-लायब्ररी, फिरते वाचनालय या विषयांवर चर्चा करण्यात आली.

या बैठकीला उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव बी.वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अमोल मुत्याल, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष गजानन कोटेवार, ग्रंथालय संघ अमरावती विभागाचे अध्यक्ष प्रभाकर घुगे, ग्रंथालय संघ मराठवाडा विभागाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, पुणे विभागाचे अध्यक्ष सोपान पवार, कोकण विभागाचे अध्यक्ष दिलीप कोरे,डॉ सिद्धी जगदाळे, डॉ सुभाष चव्हाण, सुनील वायाळ आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# शिंदेसेनेच्या तंबूत परतले जगदीश गुप्ता

## महापालिका निवडणुकीच्या तोंडावर अमरावतीच्या राजकारणात उलथापालथ

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** – महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावतीच्या राजकारणात मोठी उलथापालथ घडताना दिसत आहे. पक्षात भाव मिळत नसल्याने शिंदेच्या शिवसेनेचा राजिनामा दिलेले जगदीश गुप्ता बुधवारी( दि.7) पुन्हा शिंदे सेनेच्या तंबूत परतले. पडद्यामागील चर्चेनंतर गुप्ता पुन्हा राजकारणात सक्रिय झाले, शिंदे गटाच्या जाहीर सभेत त्यांची उपस्थिती लक्षवेधी ठरली.



भाजप-शिवसेना युतीच्या बैठकीदरम्यान आपल्याला पक्षातील पदाधिकाऱ्यांकडून बैठकीला बोलाविल्या जात नाही. वेळोवेळी होत असलेल्या चर्चांमध्ये आपले म्हणने ऐकून घेतले जात नाही. असा आरोप करित जगदीश गुप्ता यांनी शिंदे सेनेला रामराम केला होता. मात्र बुधवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शहरात आल्यावर त्यांनी गुप्तांची नाराजी दूर केली असल्याचे समजते.

# नवनीत राणांच्या बंडखोरीने भाजप मध्ये अस्वस्थता?

## भाजप-युवा स्वाभिमान युती ला घरचा आहेर



**हासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.7 )**- महापालिका निवडणूकीमध्ये अनेक प्रभागांतून युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार थेट भाजपच्या अधिकृत उमेदवारांविरोधात उभे राहिले असून, त्याला आता भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांचा उघड पाठिंबा मिळाल्याने भाजपच्या गोटात प्रचंड अस्वस्थता पसरली आहे.

भाजप आणि युवा स्वाभिमान पक्ष यांच्यात औपचारिक युती असली तरी दोन्ही पक्षांतील तणाव आता उघडपणे समोर येऊ लागला आहे. माजी खासदार नवनीत राणा यांनी केलेल्या एका जाहीर वक्तव्यामुळे भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, या प्रकरणाची पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वानेही दखल घेतल्याची माहिती आहे. लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर पक्षांतर्गत पदाधिकाऱ्यांनी नवनित राणांनी टार्गेट केले आहे. त्यातच आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तिकीट वाटपावरून भाजपमध्ये दोन स्पष्ट गट पडल्याचे चित्र निर्माण झाले आहे. निष्ठावंत व जुने कार्यकर्ते डावलले जात असल्याचा आरोप होत असून, त्यामुळे संघटनात्मक पातळीवर अस्वस्थता वाढली आहे.

साईनगर प्रभागात भाजपचे अधिकृत उमेदवार तुषार भारतीय यांच्याविरोधात युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार सचिन भेंडे यांना नवनीत राणा यांनी उघड पाठिंबा दिला. प्रचाराचा शुभारंभ करताना त्यांनी थेट तुषार भारतीय यांच्यावर हल्लाबोल केला आणि भेंडे यांना निवडून देण्याचे आवाहन केले. विलासनगर प्रभागात तर भाजपचे उमेदवार राजेश साहू यांना डावलून युवा स्वाभिमान पक्षाचे दीपक साहू सम्राट यांना निवडून आणण्याचा जाहीर प्रचार रवी राणा यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

विशेष म्हणजे, याच प्रभागातील भाजपच्या उर्वरित तीन उमेदवारांना मतदान करण्याचे आवाहन करताना हे उमेदवार युवा स्वाभिमान पक्षाच्या मंचावर बसलेले दिसल्याने राजकीय विसंगती ठळकपणे समोर आली. एकाच मंचावर मित्रपक्षाचा प्रचार आणि भाजप उमेदवारांचा विरोध, असा गोंधळलेला संदेश मतदारांपर्यंत जात असल्याने भाजप कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि संभ्रम वाढत आहे. दरम्यान, या घडामोडींमुळे निर्माण झालेली अस्वस्थता कमी करण्यासाठी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी मैदानात उडी घेतली आहे. त्यांनी कार्यकर्त्यांना थेट आणि ठाम शब्दांत दिशा देत संभ्रमाला पूर्णविराम देण्याचा प्रयत्न केला आहे.

### कार्यकर्त्यांनी कोणत्याही दबावाला बळी पडू नये - अनिल बोंडे

विलासनगर-मोरबाग प्रभागातील प्रचारादरम्यान घडलेल्या प्रकारामुळे कार्यकर्त्यांनी विचलित होऊ नये, असे आवाहन खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्पष्ट संमतीनेच भाजप उमेदवारांची निवड करण्यात आली असून, याबाबत पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आधीच भूमिका स्पष्ट केली आहे, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे कोणत्याही दबावाला बळी न पडता हिंदुत्व आणि अमरावतीच्या विकासासाठी भाजपच्या अधिकृत उमेदवारांनाच मतदान करण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.



## तरुणीचा विनयभंग

**अमरावती** – रहिमपूर पोलिस ठाणे परिसरातील रहिवासी असलेली 25 वर्षीय महिला शेतात कामासाठी जात असताना आरोपी कैलाश इंगळे दुचाकीवरून मागून आला. त्याने महिलेला शेतात सोडण्याची ऑफर देत, माझ्या शेतात ये, तुला पैसे देतो, असे अश्लील सुचविले. या प्रकाराची माहिती महिलेने आपल्या पती व सासूला दिल्यानंतर सासू व महिला आरोपीच्या घरी गेल्या. तेथे आरोपीने वाद घालत महिलेचा विनयभंग केल्याचा आरोप आहे. सोमवारी पीडितेच्या तक्रारीवरून रहिमपूर पोलिसांनी आरोपी कैलाश इंगळेविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# नवनीत राणा कुठल्या पक्षात?

## आमदार सुलभा खोडकेंचा थेट सवाल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** – माजी खासदार नवनीत राणा यांच्या अलीकडील वक्तव्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (अजितदादा पवार गट) यांच्या आमदार सुलभा खोडके यांनी जोरदार टीका केली आहे. पक्षाचे नाव वेगळे आणि काम वेगळंच सुरू आहे. माजी खासदार म्हणून नवनीत राणा यांनी अशा प्रकारची वक्तव्ये करणे शोभत नाही, असा घणाघाती आरोप त्यांनी केला.

आमदार खोडके म्हणाल्या की, मागच्या गोष्टी उकरून काढण्यात किंवा जुन्या वादांना उगाळण्यात काहीही अर्थ नाही. जनतेला विकास, काम आणि स्पष्ट भूमिका हवी आहे. त्यांनी थेट सवाल उपस्थित करत म्हटले की, नवनीत राणा नेमक्या कुठल्या पक्षात आहेत, हे आतापर्यंत स्पष्टच झालेले नाही. राणा दाम्पत्यावर टीका करताना खोडके म्हणाल्या की, एका कुटुंबातील दोघे दोन वेगवेगळ्या पक्षांत काम करत असतील, तर ते जनतेसमोर स्पष्ट असायला हवे. राणा दाम्पत्याचे धोरण दुटप्पी आहे. नवरा ‘युवा



स्वाभिमान’मध्ये तर पत्नी भाजपमध्ये काम करतात. भाजपमध्ये मुख्यमंत्री यांच्या बाजूला बसून काम करायचे आणि त्यानंतर पतीच्या पक्षाचा प्रचार करायला निघायचे, ही राजकीय भूमिका संशयास्पद आहे, असा आरोपही त्यांनी केला. विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात बोलताना आमदार खोडके म्हणाल्या, मला पराभूत करायचंच होते, तर तेव्हा मैदान मोकळंच होते. मला पाडायचे की जनतेतून निवडून आणायचे, हे आता 2029 मध्ये पाहू, असा थेट इशाराही त्यांनी दिला. राजकीय वक्तव्यांपेक्षा जनतेच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करावे, असा सल्ला देत आमदार सुलभा खोडके यांनी नवनीत राणा यांच्यावर निशाणा साधला.

## मालटेकडीजवळ दुचाकीची धडक

**अमरावती** – सिटी कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मालटेकडीजवळील मेळघाट हाट परिसरात चालत असलेल्या प्रदीप भीमराव देशमुख (70) यांना एमएच 27/सीएच 2436 क्रमांकाच्या दुचाकीने मागून धडक दिली. या अपघातात प्रदीप देशमुख जखमी झाले.

# महाराष्ट्रात गुंडाराज, कायदा-सुव्यवस्था बिघडली; भाजपासोबत युती नाही!

## हर्षवर्धन सपकाळ यांची राज्य सरकारवर टीका

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.7 )** – काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी बुधवारी (7 जानेवारी) अमरावती इथं पत्रकारांशी संवाद साधताना राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर चिंता व्यक्त करत राज्य सरकारवर आणि मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. महाराष्ट्रात सध्या %गुंडाराज% सुरू असून, ते चालवणारे सत्ताधारीच गुंड झालेत, असा घणाघाती आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. राज्यातील गुन्हेगारी घटनांमध्ये सातत्यानं वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे. कायदा-सुव्यवस्था सांभाळण्यात सरकार पूर्णत: अपयशी ठरलं आहे. राज्यात सध्या अराजकतेचे वातावरण असून पोलीस प्रशासनावर राजकीय दबाव टाकला जातोय, असंही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याचा तीव्र निषेध करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी या घटनेला सरकारच्या अपयशाचं प्रतीक असल्याचं म्हटलं आहे. या हल्ल्यात हिदायत पटेल यांचा मृत्यू झाला असून, ही घटना संपूर्ण राज्याला हादरवणारी आहे. अशा प्रकारच्या गंभीर घटनांमुळे नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या %कृपा-आशीर्वादामुळंच% संपूर्ण महाराष्ट्रात अवैध धंदे खुलेआम सुरू आहेत, असा आरोप हर्षवर्धन सपकाळ यांनी केला. तसंच त्यांनी म्हटलं की, सत्ताधाऱ्यांचे संरक्षण असल्यामुळं गुन्हेगारांवर कोणतीही कारवाई होत नाही. त्यामुळं गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी मिळत आहे.




### कायदा-सुव्यवस्था बिघडली

अंबरनाथ नगरपरिषदेत काँग्रेस-भाजपा युती झाल्याच्या चर्चांवर हर्षवर्धन सपकाळ यांनी ठाम शब्दांत भूमिका मांडली. काँग्रेसचे भाजपासोबत कुठंही, कोणत्याही स्तरावर गठबंधन नाही, असं हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केलं. तसंच अशा अफवा जाणीवपूर्वक पसरवण्यात येत असल्याचा आरोपही त्यांनी केला. याचबरोबर, देवेंद्र फडणवीस हेच गृहमंत्रिपदाचा कार्यभार सांभाळत आहेत. त्यामुळं राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री नसल्याने कायदा-सुव्यवस्थेची स्थिती अधिकच बिघडली आहे. गृहखात्यावर लक्ष केंद्रीत न केल्यामुळं गुन्हेगारीवर अंकुश राहिलेला नाही, असंही हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

### निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार

दरम्यान, बिनविरोध निवडणुकांबाबत बोलताना हर्षवर्धन सपकाळ यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. निर्विरोध निवडणुका होणं ही लोकशाहीची विकृती असल्याचं सांगत त्यांनी याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचं स्पष्ट केलं. ज्या ठिकाणी निर्विरोध निवडणुका झाल्या आहेत, त्या रद्द करून तिथं ईव्हीएमद्वारे पुन्हा निवडणूक घ्यावी आणि जनतेला मतदानाचा अधिकार मिळावा, अशी ठाम मागणीही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

# अजित पवार यांची 9 जानेवारी मुख्य प्रचार सभा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** – अमरावती महानगर पालिका निवडणूक 2026 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व उमेदवारांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची मुख्य प्रचार सभा येत्या शुक्रवार दिनांक 09 जानेवारी 2026 रोजी संत गाडगेबाबा मंदिर समोरील प्रांगण - गाडगेनगर,अमरावती येथे दुपारी 4 वाजता संपन्न होणार आहे. या प्रचारसभेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित राहून संबोधित करणार आहे. तसेच पक्षाचे आजी -माजी खासदार व आमदार तसेच वरिष्ठ नेते सुद्धा या सभेला उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याची माहिती पक्षाचे महासचिव ( संघटन ) आ.संजय खोडके यांनी दिली आहे.

अमरावती महानगर पालिकेच्या सर्व 22 प्रभागांतील 87 जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून कडून घड्याळ या चिन्हावर उभे असलेले 85 उमेदवार व दोन मित्र पक्ष (उबाठा ) चे उमेदवाराच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे शुक्रवार दिनांक 9 जानेवारी 2026 रोजी अमरावती नगरीत आगमन होणार आहे. या प्रचार सभेची महानगरात जोरात तयारी सुरु असून सर्व उमेदवार व सहकाऱ्यांमध्ये सुद्धा उत्सुकता वाढली आहे. तरी सर्व सहकारी,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सर्व फ्रंटचे पदाधिकारी तसेच उमेदवार व समस्त मतदार बांधवानी या जाहीर सभेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे - महासचिव ( संघटन ) आ.संजय खोडके व आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.



## हॉटेलसमोरून दुचाकी चोरी

**अमरावती** – शिरजागाव पोलीस स्टेशन हद्दीतील कारंजा बहिरम रोडवरील एका हॉटेलसमोरून सोमवारी दुपारी अज्ञात व्यक्तीने मोटारसायकल चोरून नेल्याची घटना घडली. चोरीस गेलेल्या मोटारसायकलची किंमत सुमारे 50 हजार रुपये आहे. या प्रकरणी सहदेव भुयार यांच्या तक्रारीवरून शिरजागाव पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# क्यूआर कोडद्वारे नावासह मतदान केंद्र शोधणे सुलभ

- स्वीप उपक्रमांतर्गत अमरावती मनपाचा अभिनव उपक्रम
- मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते उद्घाटन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** – आगामी अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत नागरिकांचा सहभाग वाढावा आणि मतदान प्रक्रियेत येणारा गोंधळ टाळावा, या उद्देशाने अमरावती महानगरपालिकेने तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर सुरू केला आहे. स्वीप उपक्रमांतर्गत क्यूआर कोडच्या माध्यमातून मतदारांना नावासह मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध करून देणारा हा अभिनव उपक्रम नुकताच मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते सुरू करण्यात आला

अमरावती शहरातील लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढावा तसेच आगामी अमरावती महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी लक्षणीयरीत्या वाढावी, या उद्देशाने अमरावती मनपाच्य वतीने विविध नाविन्यपूर्ण व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांच्या मालिकेत स्वीप कार्यक्रमांतर्गत एक महत्त्वपूर्ण व तंत्रज्ञानाधारित पाऊल उचलण्यात आले असून, नागरिकांना मतदार यादीतील आपले नाव तसेच मतदान केंद्राची माहिती सहज उपलब्ध व्हावी याकरिता विशेष क्यूआर कोड विकसित करण्यात आला आहे.




### शहरातील विविध ठिकाणी क्यूआर कोड उपलब्ध

नागरिकांना या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घेता यावा, याकरिता शहरातील गर्दीची ठिकाणे, बाजारपेठा, व्यापारी संकुले, शासकीय व खासगी दवाखाने, मंदिरे, सार्वजनिक ठिकाणे तसेच नागरिकांची नियमित वर्दळ असलेल्या परिसरात हे क्यूआर कोड लावण्यात आले आहेत. नागरिक केवळ मोबाईलद्वारे क्यूआर कोड स्कॅन करून काही क्षणांतच मतदार यादीतील आपले नाव, मतदार क्रमांक व संबंधित मतदान केंद्राची संपूर्ण माहिती मिळवू शकणार आहेत.

सदर क्यूआर कोडचे उद्घाटन नुकतेच मनपा आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी बोलताना आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी सांगितले की, मतदान हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून, कोणत्याही मतदाराला माहितीअभावी मतदाना पासून वंचित राहावे लागू नये, यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत अमरावती महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीमध्ये मतदारसंख्येत वाढ झालेली आहे. त्यानुसार काही मतदान केंद्रांमध्ये आवश्यक बदल करण्यात आले आहेत. या बदलांमुळे मतदानाच्या दिवशी मतदारांची गोंधळ, गैरसोय किंवा वेळेची नासाडी होऊ नये, यासाठी क्युआर कोड सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. या माध्यमातून मतदारांना निवडणुकीपूर्वीच आपले मतदान केंद्र कुठे आहे, याची अचूक माहिती मिळणार असून मतदानाच्या दिवशी आत्मविश्वासाने व वेळेत मतदान करता येणार आहे.

# कुणाला काहीही करू द्या, महापौर भाजपचाच होणार!

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा ठाम दावा




**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** – महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने (भाजप) बुधवारी अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासाचा जाहीरनामा जाहीर केला. यावेळी बोलताना पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी, कुणीही काहीही करू द्या, अमरावतीचा महापौर भाजपचाच होणार, असा ठाम विश्वास व्यक्त केला. मित्रपक्ष युवा स्वाभिमान पक्षासोबत युती करून भाजप ही निवडणूक लढवत असून, या युतीला भरघोस यश मिळेल, असा दावाही त्यांनी केला. युवा स्वाभिमान पक्ष भाजपविरोधात काम करत असल्याच्या आरोपांवर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले, आरोप-प्रत्यारोपांची वेळ संपली आहे; आता एकत्र येऊन विकासासाठी काम करण्याची वेळ आहे.

या कार्यक्रमाला डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रविण तायडे, केवलराम काळे, नितीन धांडे, प्रविण पोटे, शिवराय कुळकर्णी, राजेश वानखडे, प्रताप अडसड आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. भाजप आणि आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षातील युती सुसंवाद व समन्वयातून कार्यरत असून कोणतेही मतभेद नसल्याचे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. महानगरपालिका निवडणूक हेच भाजपचे पहिले व महत्त्वाचे लक्ष्य असून, कार्यकर्त्यांनी प्रचारात अधिक जोमाने उतरण्याचे आवाहन त्यांनी केले.

केंद्र, राज्य आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकाच पक्षाची सत्ता असल्यास शहर विकासाला गती मिळते, असे सांगत 2047 च्या अमरावतीच्या दूरदृष्टीने हा जाहीरनामा तयार करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. शहराच्या सुरक्षिततेसाठी 110 कोटी रुपयांच्या खर्चातून संपूर्ण अमरावती शहर सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्यात येणार असून, यासाठी मुख्यमंत्री लवकरच निधी उपलब्ध करून देतील, असेही त्यांनी सांगितले.

### नेहरू मैदान व आरओबी ‘जैसे थे’

नेहरू मैदानाचे ऐतिहासिक वैभव अबाधित राहील, असे स्पष्ट करत टाऊन हॉल व शाळा संकुलाच्या विकासासाठी स्वतंत्र ब्लूप्रिंट तयार करण्यात आल्याची माहिती देण्यात आली. शहरातील मध्यवर्ती आरओबी स्थलांतरित न करता त्याच ठिकाणी उभारण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक निधी मंजूर होणार आहे.

### अमरावतीत आयआयटी पार्कचा संकल्प

अमरावतीत औद्योगिक व तांत्रिक विकासासाठी आयआयटी पार्क उभारण्याबाबत मुख्यमंत्री वचनबद्ध असल्याचे सांगत, लवकरच जमीन वाटप करून प्रकल्प कार्यान्वित केला जाईल, असे बावनकुळे म्हणाले. अंबादेवी संकुलाचा विकास, सर्व नाले अंबादेवी नाल्याला जोडणे, भूमिगत गटार योजना यांसह अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# ज्यांनी वाजपेयी, अडवाणी, मुंडेंची ठेवली नाही ते विलासरावांची आठवण काय ठेवणार?

राज्यात मुंबई, ठाणे सह २९ महानगरपालिका निवडणुकांचा मोठ्या प्रमाणावर झंझावाती प्रचार सुरु आहे. १५ जानेवारी रोजी मतदान आणि १६ जानेवारी रोजी निक्काल लागेल. परंतु डिसेंबर महिन्यात झालेल्या नगरपालिका, नगरपंचायतीच्या असो किंवा आताच्या महानगरपालिका निवडणुका असोत अगदी हल्ली होत असलेल्या लोकसभा, विधानसभा निवडणुकांच्या प्रचाराचा दर्जा अतीशय खालावलेला दिसून येतोय.

कोण काय काय भाषणे करतो आणि या भाषणांमधून कमरेखालचे वार करण्यात येतात ते पाहून / ऐकून लाज वाटते. ही कसली लोकशाही? आणि हा असा दळभद्री प्रचार? एक बातमी वाचनात आली. 'विलासरावांच्या आठवणी लातुरातून पुसून टाकणार!', हीच ती बातमी.

त्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मुंहतोड जवाब दिलाय. पण केवळ एवढेच पुरेसे नाही. मुळात भारतीय जनता पार्टी आज जी काही आहे ती अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, विजयाराजे शिंदे यांनी ६ एप्रिल १९८० रोजी मुंबईत महाअधिवेशन घेऊन स्थापन केलेली पार्टी आज राहिलेली नाही.

पक्ष स्थापनेची तारीख जाणीवपूर्वक दिली आहे कारण भारतीय जनता पक्षात आलेल्या नवहिंदुत्ववाद्यांच्या स्मरणात ही तारीख रहावी. शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस फोडून त्यातून असंख्य लोक भारतीय जनता पक्षात प्रवेश करते झाले. हे प्रवेश साम दाम दंड भेद या सर्वांचा पुरेपूर वापर करुन देण्यात आलेले आहेत.


मुळात आजचे भारतीय जनता पक्षाचे नेते भारताला २०१४ सालीच स्वातंत्र्य मिळाले अशा भ्रमात वावरत असून पक्षाचे संस्थापक नेते अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, मुरली मनोहर जोशी, विजयाराजे शिंदे यांचीच ओळख पुसून टाकण्याच्या प्रयत्नात आहेत. गोपीनाथ पांडुरंग मुंडे यांनी संघर्ष यात्रा काढून संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला.

त्याच गोपीनाथ मुंडे यांनी २०१३ च्या सुमारास भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष पदावर देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांच्या नावाची शिफारस केली होती. त्यावेळी सुधीरभाऊ मुनगंटीवार हे प्रदेशाध्यक्ष होते. नितीन गडकरी हे भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अधिवेशन मुंबईत झाले आणि घटनादुरुस्ती करून राष्ट्रीय अध्यक्ष तसेच प्रदेशाध्यक्ष यांना प्रत्येकी तीन तीन वर्षे कालावधी वाढवून देण्यात आला.

पूर्ती कारखान्याचे नसलेल्या घोटाळ्याचे प्रकरण बाहेर काढून गडकरी यांना राजीनामा द्यावा लागला आणि राजनाथसिंह हे संकटमोचक राष्ट्रीय अध्यक्ष पदावर स्थानापन्न झाले. महाराष्ट्रात सुधीर भाऊ मुनगंटीवार यांना मुदतवाढ देण्यास गोपीनाथ मुंडे यांनी विरोध केला तेंव्हा मुनगंटीवार यांनी मला तुम्ही पदावर ठेवा किंवा ठेवू नका पण मुंडे साहेबांना पक्षाबाहेर जाण्यापासून रोखा, अशी सुस्पष्ट भूमिका पक्षश्रेष्ठींसमोर मांडली.

गोपिनाथ मुंडे यांनी देवेंद्र फडणवीस यांचे नांव सुचविले तेंव्हा अनेकांच्या भुवया उंचावल्या. अरे, मुंडे यांनी गडकरी यांच्या समर्थकाचे नांव कसे सुचविले? देवेंद्र फडणवीस हे ना गडकरींचे, ना मुंडेंचे, ते तर रेशीमबागेचे. लोकसभेच्या निवडणुका झाल्या नंतर २६ मे २०१४ रोजी नरेंद्र दामोदरदास मोदी यांनी पंतप्रधान पदाची शपथ घेतली.


पण तत्पूर्वी मंत्रिमंडळाच्या यादीत नितीन गडकरी यांचे नाव होते पण मुंडे यांचे नाव नव्हते. तेंव्हा गोपीनाथरावांनी विधानसभेचे तत्कालीन विरोधीपक्षनेते एकनाथ खडसे आणि नूतन प्रदेशाध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांना नवी दिल्ली येथे तातडीने बोलावून घेतले. त्यावेळी नरेंद्र मोदी यांच्या समोर केलेल्या जबरदस्त युक्तीवादामुळे देवेंद्र फडणवीस हे नरेंद्र मोदी यांच्या डोक्यात पक्के बसले परिणामी नरेंद्रांचा पुरेपूर वरदहस्त देवेंद्रांच्या शिरावर बसला. गडकरी बरोबर मुंडेही केंद्रात मंत्री झाले.





दुर्दैवाने गोपीनाथरावांचे ३ जून २०१४ रोजी अपघाती निधन झाले. गोपीनाथ मुंडे यांच्या देहावसानामुळे सगळी समीकरणे बदलली. देवेंद्र फडणवीस यांच्या हाती पक्ष एकवटला. गोपीनाथ मुंडेंची माणसे हळूहळू अडगळीत पडू लागली. योजनेला, रस्त्याला नांव देणे, पुतळा उभारुन त्यांना पुष्पमाला अर्पण करणे या पलिकडे मुंडे आणि त्यांचे समर्थक यांची काय परिस्थिती झाली त्याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे एकनाथ खडसे आणि प्रकाश मेहता.

पंकजा मुंडे यांचा पराभव कसा झाला, त्या पुढे कशा आल्या हा इतिहास सर्वांसमोर आहे. संसदीय लोकशाही, संविधान याचे अर्थ आपापल्या परीने लावण्यात येत आहेत. मुळात मराठवाड्यातील गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख या दोन नेत्यांनी महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात आपल्या कार्यकर्तृत्वाचा अमीट (न मिटणारा) ठसा उमटविला आहे. विलासराव आणि गोपीनाथरावांची दोस्ती जगजाहीर आहे. 'ही दोस्ती तुटायची नाय', गाणे बहुधा महेश कोठारे यांनी या दोघांवरच बेतलेले असावे, असे म्हटले तर ते वावगे ठरू नये.



**योगेश वसंत त्रिवेदी**
**मुंबई.**
**९८९२९३५३२१.**
**(लेखक ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत)**

१९९५ साली शरद कृपेने विलासरावांचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर त्यांनी विधानपरिषद निवडणुकीत शिवसेना भाजप युती चा पाठिंबा घेतला होता. अर्ध्या मताने ते पराभूत झाले. तेंव्हा विलासराव देशमुख यांच्या पाठीशी गोपिनाथ मुंडे हे भरभक्कम पणे उभे होते आणि त्याच १९९५ साली पडद्यामागून विलासराव देशमुख आणि सुधाकरराव नाईक यांनी सूत्रे फिरवली तेंव्हा तब्बल ४५ अपक्ष आमदार शिवशाही सरकारच्या पाठीशी उभे राहिले आणि १४ मार्च १९९५ रोजी डॉ. मनोहर गजानन जोशी आणि गोपीनाथ पांडुरंग मुंडे हे अनुक्रमे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री झाले.

विधानपरिषद निवडणुकीत उभ्या असलेल्या विलासराव देशमुख यांचे काँग्रेस पक्षातून निलंबन करण्यात आले आणि ते पराभूत झाल्यावर पुनश्च काँग्रेस पक्षात प्रवेश करते झाले. त्यावेळी मी सामनामध्ये त्यांची प्रतिक्रिया दिली होती की माझ्या रक्तातून काँग्रेस कोण काढणार? हा मथळा आठ स्तंभात सामनामध्ये आला होता.

विलासरावांनी हीच आठवण २००५ साली विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात बोलून दाखविली होती. १९९९ साली विलासराव देशमुख यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे समर्थन घेऊन मुख्यमंत्री पद मिळविले. त्याच काळात सौ. प्रतिभाताई पाटील या पहिल्या महिला मराठी राष्ट्रपती झाल्या.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे घटक असतांनाही हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी त्यांना पाठिंबा दिला होता आणि त्याबद्दल आभार मानण्यासाठी मुख्यमंत्री विलासराव दगडोजीराव देशमुख आणि उपमुख्यमंत्री रावसाहेब रामराव उर्फ आर आर पाटील यांनी मातोश्रीवर बाळासाहेब ठाकरे यांची मोठ्या मनाने भेट घेतली होती.

विलासराव देशमुख यांनी ज्या ज्या खात्याचे मंत्रीपद भूषविले त्या त्या खात्यांचा त्यांनी लातूर जिल्ह्यासाठी उपयोग करुन घेतला. इतकेच नव्हे तर रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग हे दोन जिल्हे स्वतंत्र झाले आणि सिंधुदुर्गची राजधानी ओरोस की कुडाळ या वादात दहा वर्षे गेली तेंव्हा दहा वर्षांचे दोनशे कोटी रुपये विलासरावांनी लातूर जिल्ह्यात नेले.

शंकरराव चव्हाण यांना मराठवाड्याचे भाग्यविधाते म्हणून संबोधण्यात येते.

त्यांचे राजकीय शिष्य विलासराव देशमुख होते. अशोक चव्हाण हे विलासरावांचे गुरुबंधू. परंतु विलासरावांनी वादग्रस्त विषय टाळून लातूर जिल्ह्याचा विकास घडवून आणला आणि विकास कोणी आपल्याला ताटात वाढून देणार नाही तर तो खेचून आणावा लागतो, असे विलासराव देशमुख यांनी ठणकावून सांगितले होते.

वैधानिक विकास मंडळाला व्यक्तीशः विरोध असतांना राजकीय अपरिहार्यतेमुळे त्यांनी मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे स्वागत केले. लातूर हे अत्यंत विकसित कसे होईल याकडे त्यांचा कटाक्ष असे. मांजरा सहकारी साखर कारखाना चालवितांना त्यांनी शेतकऱ्यांना सर्वांपेक्षा जास्त भाव मिळवून दिला.

विलासराव देशमुख यांचे अमित, धीरज आणि रितेश हे तीन सुपूत्र आज त्यांचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत, दोघे जण राजकारणात तर रितेश चित्रपट सृष्टीत नावाजलेले आहेत. आई वैशाली आणि काका दिलीपराव मार्गदर्शन करीत आहेत.

त्यामुळे विलासरावांचे नांव पुसण्याचा विचार (राणा भीमदेवी थाटात राजकीय भाषण) करणाऱ्यांना सात जन्म घेऊनही ते जमणे निव्वळ अशक्य आहे. परंतु ज्यांनी अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, गोपीनाथ मुंडे यांची आठवण ठेवली नाही त्यांच्याकडून विलासरावांबद्दल काय अपेक्षा ठेवणार?

---

## उत्स्फूर्त, अभ्यासू, दिलखुलास
# मुलाखतकार अश्विनी कोळेकर



घरातील वाचनसंस्कृतीच्या संस्कारातून शब्दातील नेमकेपणा, भाषाशैली आणि संवादकौशल्य विकसित झाले.

त्याला अनुभवाची आणि शिक्षणाची जोड देत उत्स्फूर्त व नैसर्गिकपणे समोरच्याला बोलतं करत विषय खुलविण्याचं कसब ज्यांनी स्वतःमध्ये निर्माण केलं आहे, अशा सर्वव्यापी मुलाखतकार म्हणून अश्विनी कोळेकर आज सर्वांच्या परिचयाच्या आहेत. चित्रांगणच्या माध्यमातून त्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, चित्रपट, अर्थ अशा सर्वच क्षेत्रांतील दिग्गजांच्या मुलाखती अगदी दिलखुलासपणे घेत आहेत.



माणूसपणाची पाऊलवाट
सुजाता बंडावार
mahasagarngp@gmail.com

आई पुष्पा धायगुडे आणि नायब तहसीलदार म्हणून कार्य केलेले विजय धायगुडे यांनी अत्यंत कठीण परिस्थितीतही मुलांना शिक्षणाची गोडी लावली. याच संस्कारातून अश्विनी धायगुडे-कोळेकर यांनी डी.एड., बी.एड. आणि एम.एड.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. मात्र, आत असलेली पत्रकारिता त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांनी अनेक वृत्तपत्रांतून पत्रकारितेची कारकीर्द सुरू केली.

अनेक वर्षे त्यांनी चित्रपटांवर लेखन केले. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळात काम करण्याची संधी मिळाली आणि चित्रशारदा या मुखपत्राच्या व्यवस्थापकीय संपादक म्हणून त्या कार्यरत झाल्या. त्या सांगतात की, हा काळ त्यांच्या जीवनातील टर्निंग पॉईंट ठरला.

या संधीचे सोने करत चित्रशारदाच्या माध्यमातून त्यांनी प्रख्यात गायिका आशा भोसले, अभिनेत्री उर्मिला मातोंडकर, विक्रम गोखले, मोहन आगाशे, लक्ष्मण उतेकर, अमोल कोल्हे यांच्यापासून ते आयुष्मान खुराना, अनन्या पांडे, प्रतीक गांधी, अनंत महादेवन अशा अनेक दिग्गजांच्या मुलाखती घेतल्या. त्यांचे सांगणे आहे की, जर तुम्हाला गोष्टी घडाव्यात असे वाटत असेल, तर त्या घडवून आणाव्या लागतात. याच विचारातून आपल्या पाठीशी असलेल्या अनुभवाला आणि निर्माण झालेल्या स्वतःच्या ओळखीला त्यांनी चित्रांगण मीडिया सर्व्हिसेसचा नवा आयाम जोडला.

या फर्मच्या माध्यमातून त्या कंटेंट रायटिंग करतात तसेच चित्रांगण युट्युब चॅनलही चालवतात. आपल्या लिखाणाचा परीघ विस्तारत, या युट्युब चॅनलद्वारे त्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि चित्रपट क्षेत्रातील प्रथितयश व्यक्तींच्या मुलाखती आत्मविश्वासपूर्वक आणि दिलखुलासपणे घेऊ लागल्या.

या प्रवासात ममता सिंधुताई सपकाळ आणि डॉ. नानासाहेब थोरात यांसारख्या व्यक्तींच्या मुलाखती विशेष आठवणीच्या असल्याचे त्या सांगतात.

एका प्रश्नाच्या उत्तरात त्या म्हणाल्या की, प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांची मुलाखत त्यांच्या अंतरात्म्यावर खोलवर परिणाम करणारी ठरली. व्यावसायिक, सामाजिक आणि कौटुंबिक पातळीवरील सर्व अडचणींना मोठ्या धैर्याने तोंड देत त्यांनी ज्या ताकदीने स्वतःला सिद्ध केले, ते खरोखरच विलक्षण आणि अप्रतिम आहे, असे त्या नमूद करतात.

आणखी एक आठवण त्या प्रकर्षाने सांगतात. केदार शिंदे यांची सुखी माणसाचा सदरा ही मालिका कलर्स मराठीवर सुरू होती; मात्र काही कारणांमुळे ती बंद पडली. त्या काळात अश्विनी यांनी केदार शिंदे यांची मुलाखत घेऊन चित्रशारदा मुखपत्रात प्रसिद्ध केली होती. यावर केदार शिंदे यांनी भावपूर्ण शब्दांत पत्राद्वारे कळवले की, ही मालिका प्रेक्षकांना फारशी रुजली नसली, तरी तुम्ही ज्या पद्धतीने तिची मांडणी करून ती जनमानसापर्यंत पोहोचवली, त्याबद्दल मी मनापासून आभारी आहे. हा अनुभव त्या अत्यंत भावूक होऊन सांगतात.

प्रत्येक मुलाखतीपूर्वी त्या संबंधित व्यक्तीच्या कार्याचा सखोल अभ्यास करतात आणि एक छोटीशी प्रश्नावली तयार करतात. आपल्या संवादकौशल्याच्या जोरावर आणि नेमक्या शब्दमांडणीतून त्या मुलाखत बहरवतात. म्हणूनच त्या आज एक अभ्यासू, उत्स्फूर्त आणि दिलखुलास मुलाखतकार म्हणून नावारूपाला आल्या आहेत.

पत्रकारिता करत असताना त्या सामान्यांच्या आवाज बनल्या. विद्यार्थ्यांचे शिक्षण, त्यांच्यासाठी आवश्यक शैक्षणिक साहित्य, मुलींना सॅनिटरी पॅडचे वाटप, रुग्णसेवा, तसेच कोरोनाच्या काळात केलेले आर्थिक सहाय्य अशा छोट्या-छोट्या कामांतून त्यांनी आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. यातून मला मोठे समाधान मिळते, असे त्या आनंदाने सांगतात.

त्या म्हणतात की, स्पर्धा आणि घराणेशाही सर्वत्र आहे; मात्र मेहनत, स्वतःवर विश्वास आणि स्वतःवर काम करण्याची तयारी असेल, तर सर्व क्षेत्रे तुमच्यासाठी पायघड्या घालून उभी राहतात. पुढील काळात आणखी अनेक दिग्गजांच्या मुलाखती घ्यायच्या असून, चेहरा नसलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना चेहरा मिळवून द्यायचा आहे, असे त्या निष्ठेने सांगतात.

कर्तृत्ववान आणि प्रकाशझोतात आलेल्या व्यक्तींना करावा लागणारा संघर्ष समाजासमोर मांडत त्या तरुणांसमोर आदर्श निर्माण करीत आहेत. त्यांचा हा प्रवास असाच अव्याहतपणे सुरू राहो, यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा.

---

**अश्विनी कोळेकर संपर्क क्रमांक**
**७७४१८२७५३२**

---

# शहरांतील वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण हवेच!

२०२५ मध्ये अनेक उत्पादनांवरील जीएसटी कर कमी झाल्याने त्यांची खरेदी वाढली. वाहनांवरील जीएसटीही कमी झाल्याने या वर्षात लोकांनी मोठ्या प्रमाणात वाहने खरेदी केली.

२०२५ मध्ये राज्यात ३२.३८ लाख वाहनांची नोंदणी झाली. २०२४ च्या तुलनेत हा आकडा १३.५५ टक्यांनी अधिक आहे. पुणे जिल्ह्यात सर्वाधिक वाहनांची नोंद झाली असून यावेळी पुण्याने मुंबईलाही मागे टाकले. केवळ पुण्यात २. ११ लाखाहून अधिक दुचाकी खरेदी केल्या गेल्या. १५ वर्षांहून जुने व्यावसायिक वाहन आणि २० वर्षांहून अधिक जुने खासगी वाहन असेल तर त्याचे फिटनेस प्रमाणपत्र काढून गाडया वापरण्याची मुभा देण्यात आली आहे.

ज्या प्रमाणात रस्त्यावरील वाहने वाढत आहेत त्या तुलनेत ती स्क्रॅप केली जात नाहीत त्यामुळे वाहनांचा समतोल राखला जात नाही. शहरांसारख्या ठिकाणी रस्त्यांची मर्यादित लांबी रुंदी, पार्किंगसाठी उपलब्ध जागा आणि सध्या चालू असणारी विकासकामे पाहता वाढती वाहनसंख्या भविष्यात शहरांतील जीवनमानावर गंभीर परिणाम करू शकते.

आपल्याही दारात आपली स्वतःची गाडी असावी असे प्रत्येक व्यावहारिक माणसाचे स्वप्न असते. दरवर्षी गुढीपाडवा, दसरा आणि दिवाळी या सणांना मोठ्या प्रमाणात वाहने खरेदी केली जातात. शहरांत पूर्वी सर्वच गाड्या पेट्रोल डिझेलवर चालणाऱ्या असत, त्यानंतर सीएनजीचा पर्याय आला. इंधनखर्च वाचावा म्हणून लोकांनी आपल्या जुन्या गाड्या विकून सीएनजीवर चालणाऱ्या गाड्या खरेदी केल्या. आता विजेवर म्हणजेच बॅटरीवर चालणाऱ्या गाड्या बाजारात येऊ लागल्या आहेत. त्यामुळे लोकांकडून या गाड्यांना अधिक पसंती मिळू लागली आहे.



**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई.**
**९६६४५५९७८०**

टॅक्सी रिक्षा यांच्याप्रमाणे खासगी वाहनांच्या खरेदी विक्रीवर कोणतेच बंधन नसल्याने शहरातील वाढती वाहनसंख्या डोकेदुखी ठरू लागली आहे. शहरांतील वाढत जाणारी वाहनांची संख्या विचारात घेता भविष्यात मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागण्याची दाट शक्यता आहे. लोकसंख्येच्या भस्मासुराने मुंबई, ठाणे, पुणे सारख्या शहरांना आधीच गिळंकृत केले आहे. याचा भार लोकलगाड्या, बसगाड्या, टॅक्सी आणि रिक्शा यांवर पडत आहे. यांवर पर्याय म्हणून सुरु केलेली मोनो आणि मेट्रो रेल्वेही कमी पडू लागल्या आहेत.

आजमितीला शहरातील लोकांचे राहणीमान उंचावल्याने आणि लोकल अन् बस गाड्यांतील जीवघेणी गर्दी नकोशी वाटू लागल्याने सर्वसामान्य नोकरदारही स्वतःच्या मालकीचे वाहन घेऊ लागला आहे.

व्यवसायासाठी घेतल्या जाणाऱ्या रिक्शा-टॅक्सींसह, ओला, उबेर 'रॅपीडो' यांसारख्या वाहतूक आस्थापनांच्या माध्यमांतून व्यवसाय करण्यासाठी विकत घेण्यात येणाऱ्या वाहनांचीही दरवर्षी यांमध्ये भर पडत आहे. वाढत जाणाऱ्या वाहनांच्या तुलनेत मुंबई-ठाण्यातील रस्त्यांची संख्या आणि आकारमान मर्यादित आहे.

मुंबईतील इंच इंच जागेला सोन्याचा दर असल्याने गाड्या उभ्या करण्यासाठी मोकळ्या जागाही कमी पडत आहेत. रस्त्यांवर उभ्या केल्या जाणाऱ्या गाड्या वाहतुकीला अडथळा ठरत आहेत. त्यामुळे वाढत्या वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याची आज नितांत गरज निर्माण झाली आहे.

दर वर्षी मुंबईतील वाहनांच्या संख्येत दोन ते तीन लाख वाहनांची भर पडते. पेट्रोल, डिझेल आणि गॅसचे दर वाढले असले तरी मुंबईकरांच्या हौसेपुढे ते नगण्य आहेत असेच म्हणावे लागेल.

मुंबईत वाढत जाणारी वाहनसंख्या वायू आणि ध्वनी प्रदूषणात मोठ्या प्रमाणात भर घालत आहे. परिणामी नागरिकांना विशेषतः लहान मुलांना आणि वयस्कांना श्वसनाचे आणि फुफ्फुसांचे विकार जडत आहेत. शहरांत चालू असलेले मेट्रो-मोनो रेल्वे प्रकल्प, तसेच विविध कामांसाठी रस्त्यांत नियमितपणे होणारे खोदकाम या सर्वांचा परिणाम वाहतुकीच्या गतीवर होत असतो.

त्यामुळे शहरातील सिग्नल यंत्रणेवर वर्दळीच्या वेळेत मोठ्या प्रमाणात ताण येतो. यांवर पर्याय म्हणून सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत अवजड वाहनांना मुंबईत प्रवेशबंदी करण्यात आली आहे. मात्र त्याचाही विशेष लाभ होताना दिसत नाही.

मुंबईप्रमाणे नवी मुंबई, ठाणे, पुणे या प्रगतशील शहरांतही काहीशी अशीच परिस्थिती आहे. वाहनसंख्येची समस्या लवकरच रौद्र रूप धारण करू शकते. यासाठी राज्य प्रशासनाने चिंतन करून वाहनसंख्येवर नियंत्रण आणण्याचे आणि या भीषण समस्येविषयी लोकजागृती करण्याचे उपाय लवकरात लवकर शोधले पाहिजेत.

---

**वाचक लिहितात**

## मकरसंक्रांत आणि नायलॉन मांजा आनंद की जीवघेणा धोका?

तिळगुळ घ्या, गोड गोड बोला असे सांगणारी मकरसंक्रांत आपण येत्या काही दिवसांतच साजरी करणार आहोत. आनंद,आपुलकी आणि ऋतुबदलाचा संदेश देणारा असा हा सण आहे. भारतातील प्रत्येक राज्यात मकरसंक्रांत विविध नावांनी आणि वेगवेगळ्या पद्धतींनी साजरी केली जाते. या सणातील एक महत्त्वाची परंपरा म्हणजे पतंग उडवणे! पतंग उडवणे म्हणजे एक प्रकारे आकाशासोबत नाते जोडले जाणे असे मानले जाते.

मात्र, आज पतंग उडवणे अनेकांसाठी जीवघेणा खेळ ठरत आहे. पतंग उडवण्यासाठी वापरण्यात येणारा नायलॉनचा मांजा हा अत्यंत मजबूत व धारदार असतो. हा मांजा पक्ष्यांच्या पंखात, मानेत किंवा पायात अडकला तर त्यांना असह्य वेदना होतात आणि अनेकदा त्यांचा मृत्यूही होतो. दरवर्षी हजारो पक्षी या मांज्यामुळे मृत्युमुखी पडतात. इतकेच नव्हे, तर दुचाकीस्वारांचे गळे चिरले जाण्याच्या, गळ्याभोवती मांजा आवळल्याने वाहनावरून खाली पडण्याच्या अनेक गंभीर घटना घडतात. बरेचदा, पतंग उडवल्यानंतर मांजा झाडांवर, विजेच्या तारांवर अडकून राहतो त्यामुळे देखील धोका निर्माण होतो. म्हणूनच नायलॉन मांज्याच्या वापरावर कठोर बंदी घालणे अत्यंत आवश्यक आहे.

शासनाने अशा मांज्याची विक्री, साठवणूक आणि वापर यांवर कठोर दंड आणि कारावासाची कारवाई अमलात आणली पाहिजे. केवळ कायदे करून थांबणे पुरेसे नसून, त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एक सुज्ञ नागरिक म्हणून खरेच पतंग उडवणे किती आवश्यक आहे? याचाही आत्मपरीक्षणपूर्वक विचार करायला हवा. आपल्या मुलांना योग्य मार्गदर्शन करून निसर्ग, पक्षी आणि माणसांच्या जीवाचे महत्त्व पटवून देणे ही आजची गरज आहे.

**■ सौ. प्रिया बागडदेव**
**छिंदवाडा.**

## दाखवायचे वेगळे आणि खायचे वेगळे...

राज्यात नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांनंतर आता २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. साधारणतः आठवडाभर आणखी कानठल्या बसवणारा प्रचार सुरू राहिल. या निवडणुकीत काही ठिकाणी भाजपा, शिंदेसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी एकत्र तर कुठे स्वतंत्र लढत आहेत. निवडणुकीतील युती आणि आघाड्यांविषयी एक बातमी वाचनात आली ती अशी की, कट्टर विरोधी काँग्रेस आणि एमआयएम या पक्षांसोबत भाजपाने काही ठिकाणी युती केली आहे.

त्यावर मुख्यमंत्र्यांनी संबंधित नेत्यांना खडसावले असले तरी, प्रत्यक्षात अशी युती, आघाडी अस्तित्वात येतेच कशी? भाजपाचे लोकं सातत्याने काँग्रेस व एमआयएमवर तोंडसुख घेतात, यांना देशविरोधी ठरवतात. परंतु, निवडणूक आली की सर्व मूल्य, नैतिकता, आदर्श बासनात गुंडाळून जिंकण्यासाठी, सत्तेसाठी कुठल्याही स्तराला जातात, हेच या हातमिळवणीतून दिसून येते. याचाच अर्थ भाजपाचे दाखवायचे दात वेगळे आणि खायचे दात वेगळे आहेत. सर्वसामान्य मतदारांना निष्ठेचे मोल सांगायचे, आदर्शाच्या गप्पा करायच्या आणि दुसरीकडे ज्यांना शिव्याशाप द्यायच्या, त्यांच्याच हातात हात घालून फिरायचे. हे कसे?

**■ राजेंद्र वासनिक, नागपूर.**

---

## या सुपरफुडमुळे किडनीचं आरोग्य राहील तंदुरुस्त



किडनी म्हणजेच मूत्रपिंड हे तुमच्या शरीरातील एक महत्त्वाचे अवयव आहे, जे अनेक कार्ये करते. ते तुमचे रक्त शुद्ध करते, शरीरातील द्रव संतुलन राखतात आणि विषारी पदार्थ काढून टाकतात.

पण, जेव्हा तुमचे मूत्रपिंड योग्यरित्या कार्य करत नाहीत, तेव्हा विषारी पदार्थ तुमच्या शरीरात बराच काळ राहतात, ज्यामुळे तुमच्या आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगभरात अंदाजे ६७४ दशलक्ष लोक दीर्घकालीन मूत्रपिंडाच्या आजाराने ग्रस्त आहेत.

पण काळजी करू नका, तुम्ही साधे पदार्थ समाविष्ट करून तुमचे मूत्रपिंड निरोगी ठेवू शकता. आज आम्ही तुम्हाला अशा पदार्थांबद्दल सांगणार आहोत जे तुमच्या मूत्रपिंडांना नैसर्गिकरित्या आधार देऊ शकतात.

तथापि, हे लक्षात ठेवा की हे पदार्थ तुमच्या मूत्रपिंडांना रात्रीतून डिटॉक्स करणार नाहीत, परंतु जर ते दररोज खाल्ले तर ते तुमच्या मूत्रपिंडांना कार्य करण्यास सोपे करू शकतात.

लसूणचा मूत्रपिंडांना थेट फायदा होत नसला तरी, अप्रत्यक्षपणे करतो. ते सूज कमी करते आणि रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते. लसूण मीठाचे सेवन कमी करण्यास देखील मदत करते, ज्यामुळे मूत्रपिंडांवरील ताण कमी होतो. कच्चा किंवा हलका भाजलेला लसूण सर्वात फायदेशीर आहे.

यादीत सफरचंद देखील आहे, जे प्रामुख्याने तुमच्या पचनसंस्थेला मदत करतात. त्यात फायबर असते, जे आतड्यांमधील कचरा काढून टाकते, ज्यामुळे मूत्रपिंडांवरील भार कमी होतो. सफरचंद रक्तातील साखर नियंत्रित करण्यास आणि मूत्रपिंडाच्या लहान रक्तवाहिन्यांना नुकसान होण्यापासून वाचवण्यास देखील मदत करते. सफरचंद त्यांच्या सालीसह खाल्ल्याने सर्वात जास्त फायदे होतात.

धणे मूत्र तयार करण्यास आणि शरीरातून अतिरिक्त सोडियम काढून टाकण्यास मदत करते. यामुळे द्रवपदार्थ टिकवून ठेवण्यास मदत होते आणि मूत्रपिंडांचे कार्य करणे सोपे होते. रात्रभर बिया भिजवून सकाळी पाणी पिणे हा मूत्रपिंडांना विषमुक्त करण्याचा एक सोपा आणि नैसर्गिक मार्ग आहे.

बहुतेक भाज्यांमध्ये पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे मूत्रपिंडांवर ताण येऊ शकतो. तथापि, फुलकोबीमध्ये पोटॅशियमचे प्रमाण कमी असते आणि ते फायबर, व्हिटॅमिन सी आणि अँटिऑक्सिडंट्सने भरलेले असते. ते यकृताला देखील आधार देते.

---

**अशोकायन**

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## सत्ता सुंदरी..!

जन्मजात हाडवैर असणारे
एकमेकांचे मित्र बनती
सत्तेच्या मोहापायीच
भाऊ भाऊ वैरी बनती ..

सत्तेच्या लालसेपायीच
होते पक्षांचे गठबंधन
नाही बसला मेळ तर
प्रसंगी होते धृवीकरण ..!

निमित्ताला कारण
काहीतरी सांगावे लागते
मतदार ओळखुन आहे
बरं पाणी कुठे मुरते? ..

# ॲमवे इंडिया चा आता जलद आणि अखंड सेवेसह घरपोच डिलिव्हरीचा पूर्णपणे बदलेला अनुभव

**नागपूर, ७जानेवारी :** स्वास्थ्य आणि कल्याणाच्या गरजा पूर्ण करणारी एक आघाडीची कंपनी, ॲमवे इंडिया ने आज आपल्या होम डिलिव्हरी सेवेमध्ये मोठ्या सुधारणा केल्याची माहिती दिली. या सुधारणांमुळे देशभरातील वितरक आणि त्यांच्या ग्राहकांसाठी जलद, अधिक विश्वासार्ह आणि अखंड ऑर्डर करता येण्याचा अनुभव देण्याची कंपनीची वचनबद्धता अधिक स्पष्ट झाली आहे. गेल्या पाच वर्षांत, ॲमवे ने आपली होम डिलिव्हरी क्षमता मोठ्या प्रमाणात मजबूत केली असून, डिलिव्हरीच्या वेळेत ४८% कपात (३.१ दिवसांवरून अवघ्या १.६ दिवसांपर्यंत) करून मोठा बदल घडवून आणला आहे. तसेच, दुसऱ्या दिवशी मिळणाऱ्या डिलिव्हरीचे प्रमाण २९% वरून ५५% पेक्षा जास्त झाले आहे. या सुधारित अनुभवाला त्यांच्या सर्व्हिस नेटवर्कच्या मोठ्या विस्ताराची जोड मिळाली असून, आता हे नेटवर्क ८००० वरून १७,५०० पेक्षा जास्त पिन कोड्सपर्यंत पोहोचले आहे, जे भारताच्या एकूण पिन कोड्सच्या ९०% पेक्षा जास्त आहे. हे टप्पे भारतातील ग्राहकांसाठी दर्जेदार वेलनेस उत्पादने सहज उपलब्ध करून देण्याच्या ॲमवे च्या ठाम वचनबद्धतेचे प्रतीक आहेत.

या बदलावर भाष्य करताना ॲमवे इंडिया चे मॅनेजिंग डायरेक्टर रजनीश चोप्रा म्हणाले, आमच्या धोरणाच्या केंद्रस्थानी वितरक आणि ग्राहक असल्याने, आम्ही होम डिलिव्हरीला एक 'स्ट्रॅटेजिक पिलर' (धोरणात्मक स्तंभ) म्हणून विकसित करत आहोतअसा स्तंभ जो अधिक चांगली सेवा देण्यास सक्षम आहे, उत्पादनांची उपलब्धता सुधारतो आणि संपूर्ण भारतात विनाअडथळा अनुभव देतो. हा बदल मजबूत राष्ट्रीय भागीदारी, अधिक सक्षम डिजिटल पाया आणि अत्यंत चपळ पुरवठा साखळीमधील धोरणात्मक गुंतवणुकीमुळेशक्य झाला आहे; ज्यामुळे आम्हाला वेगाने प्रतिसाद देणे, अधिक हुशारीने काम करणे आणि अधिक सातत्याने सेवा देणे सोपे झाले आहे. प्रत्यक्षात जमिनीवर जे बदल दिसत आहेत, त्यावरून मला खात्री मिळतेय की: आमची पोहोच आता अधिक मजबूत आहे, आमची यंत्रणा अधिक स्मार्ट आहे आणि आजचा अनुभव पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने सुटसुटीत आहे. पुढे जाताना, आमचे लक्ष विश्वासार्हता अधिक वाढवण्यावर, 'अनबॉक्सिंग' अनुभव अधिक चांगला करण्यावर आणि भारतभरातील आमच्या ग्राहकांसाठी भविष्यासाठी सज्ज अशी डिलिव्हरी इकोसिस्टम तयार करून आमचा दर्जा अधिक उंचावण्यावर आहे.

यात भर घालत, ॲमवे इंडियाचे ग्लोबल ओम्नी चॅनेल लॉजिस्टिक्स, कस्टमर सर्व्हिसेस आणि उत्तर क्षेत्राचे सिनियर व्हाइस प्रेसिडेंट संजीव सुरी म्हणाले, सप्लाय चेन आता केवळ 'खर्चाचे केंद्र' न राहता 'मूल्य निर्माण करणारे' माध्यम म्हणून विकसित होत आहे. त्यामुळे ॲमवेमध्ये आमचे लक्ष एक अशी इंटेलिजेंट, प्रतिसाद देणारी आणि लोकांच्या गरजा समजून घेणारी यंत्रणा उभारण्यावर आहे, जी ग्राहकांना खऱ्या अर्थाने उत्तम सेवा देईल. आमच्या होम डिलिव्हरी ऑपरेशन्समध्ये झालेली प्रगती याच बदलाचे प्रतिबिंब आहे. प्रगत ॲनालिटिक्स, विविध टीम्समधील उत्तम समन्वय आणि राष्ट्रीय कुरिअर कंपन्यांसोबतच्या भक्कम भागीदारीमुळे आम्ही डिलिव्हरीचा वेग वाढवला आहे, विश्वासार्हता सुधारली आहे आणि विविध भौगोलिक भागांतील ग्राहकांना सेवा देण्याची आमची क्षमता अधिक मजबूत केली आहे. आमचा हा प्रवास रियल-टाइमव्हिजिबिलिटी (थेट देखरेख), सक्रिय संवाद आणि आव्हानात्मक काळात घेतलेल्या ठाम निर्णयांमुळे यशस्वी झाला आहे. भविष्याचा विचार करता, भारतभरातील आमच्या ग्राहकांसाठी विनाअडथळा आणि 'फ्युचर-रेडी' डिलिव्हरी अनुभव तयार करण्यासाठी आम्ही एआय, डिजिटल टूल्स आणि फ्रंटलाइन कर्मचाऱ्यांचे सक्षमीकरण या गोष्टींचा समावेश करणे सुरूच ठेवू.

ॲमवेची उत्पादने ॲमवे वितरकांकडे, कंपनीच्या वेबसाइटवर (www.amway.in) आणि देशभरातील ॲमवे स्टोअर्समध्ये उपलब्ध आहेत.

# एचडीएफसी बँक स्मार्ट गेटवे पेमेंट मंचाचे सीबीडीसीचे एकत्रिकरण पूर्ण

**नागपूर, ७जानेवारी :** एचडीएफसी बँके तर्फे आज रिझर्व्ह बँकेच्या सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (सीबीडीसी) या डिजिटल रुपयाचे (ई रुपी) चे त्यांचा ऑनलाईन मर्चंट पेमेंट मंच असलेल्या स्मार्ट गेटवे मध्ये एकत्रिकरण करण्यात आल्याची घोषणा करण्यात आली. आता या एकत्रिकरणामुळे व्यापाऱ्यांना आता त्यांच्या ग्राहकांना सुरक्षित, शून्य खर्चात आणि सॉव्हरेन वर आधारीत डिजिटल पेमेंटचा पर्याय हा एचडीएफसी बँकेच्या चेकआऊट पध्दतींमध्येही उपलब्ध झाला आहे.

या सुधारणे मुळे स्मार्टगेटवे चे व्यापारी आता डिजिटल रुपयांच्या स्वरुपात कोणत्याही खर्चाशिवाय पेमेंट स्विकारु शकतील. त्याच बरोबर सध्याच्या यूपीआय, कार्ड्स आणि नेट बँकिंगचा वापरही त्यांना करता येणार आहे. ग्राहकांना आता अगदी लगेच आणि सुरक्षित पध्दतीचा अवलंब करुन डिजिटल पेमेंटचा समृध्द अनुभव प्राप्त करता येणार आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंत एचडीएफसी बँके ने प्रायोगिक तत्वावर काम करणे सुरु केल्यापासून अंदाजे ८.४५ लाख नोंदणीकृत सीबीडीसी वॉलेट्स ना सेवा दिली असून त्यामध्ये दरमहा १३,००० ते १५,००० वॉलेट्सची वाढ होत आहे.

शून्य खर्चात वापर करणे शक्य असल्याने सीबीडीसी मध्ये व्यापाऱ्यांना भविष्यासाठी तयार, दलाल विरहीत पेमेंट पध्दती मिळाल्याने अगदी कमी खर्चात शाश्वततेने सुधारीत अशी पेमेंट पध्दती प्राप्त होते. ग्राहकांसाठी सुध्दा डिजिटल रुपया मुळे यूपीआय चा सोपेपणा, आरबीआयची डिजिटल करन्सी यांचा लाभ झाल्याने व्यवहार वेगाने, सुरक्षित आणि मोफत करता येतात.

सीबीडीसी चे व्यापाऱ्यांसाठी असलेल्या स्मार्ट गेटवे बरोबरच्या एकत्रिकरणा मुळे एचडीएफसी बँके तर्फे आणखी एक पेमेंटची पध्दत जोडण्यात यश मिळवले असून यामुळे सॉव्हरेन वर आधारीत डिजिटल करन्सीचा लाभ अधिकाधिक व्यावसायिकांना प्राप्त होऊ शकेल.

या उपक्रमाच्या अंमलबजावणी मुळे एचडीएफसी बँकेचे डिजिटल फर्स्ट म्हणून असलेले स्थान अधिक सक्षम होऊन नाविन्य देण्याची वचनबध्दता वाढून कमी प्रमाणातील रोख व्यवहार करण्यास चालना मिळून सर्वसमावेशक डिजिटल अर्थव्यवस्था होउ शकेल.

# वोक्हार्ट हॉस्पिटल्समध्ये एआय आधारित रोबोटिक गुडघ्याच्या शस्त्रक्रियेने रुग्णाचे आयुष्य बदलले



**नागपूर, ७ जानेवारी :** इटारसी येथील रहिवासी रघुवीर पाल यांना अनेक वर्षांपासून सतत घुडघ्याचा त्रास होत होता, ज्यामुळे त्याची चालण्याची क्षमता आणि जीवनमान खूप प्रभावित झाले होते. रोजच्या हालचाली जसे की चालणे, जिन्यावर चढणे, आणि जास्त वेळ उभे राहणे, यांसारख्या दैनंदिन गोष्टी त्याच्यासाठी खूप वेदनादायक आणि कठीण झाल्या होत्या. अनेक ऑर्थोपेडिक तज्ज्ञांकडे सल्ला घेतला आणि औषधे, फिजिओथेरपी, आणि जीवनशैलीत बदल यासारखे विविध उपचार करून बघितले, तरी त्याला फारसा आराम मिळाला नाही.

त्यानंतर पाल यांच्यावर वोक्हार्ट सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, नागपूर येथे एआय-आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून पहिली पूर्ण घुडघा बदलण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली. डॉ. मुकुंद अग्रवाल यांनी केलेली ही शस्त्रक्रिया या भागातील रोबोटिक ऑर्थोपेडिक शस्त्रक्रियेसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. या प्रगत रोबोटिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रक्रियेच्या वेळी तात्काळ नियोजन करता आले आणि रुग्णाच्या शरीररचनेनुसार घुडघ्याचे इम्प्लांट अत्यंत अचूकपणे बसवता आले.

शस्त्रक्रियेनंतरचे परिणाम खूपच चांगले होते. शस्त्रक्रियेनंतर अवघ्या आठ तासांतच पाल यांना डॉक्टरांच्या देखरेखीखाली उभे राहायला आणि चालायला सांगण्यात आले. हे रोबोटिक आणि स्नायू सुरक्षित ठेवणाऱ्या तंत्रज्ञानाचे मोठे फायदे दाखवते. त्यांना शस्त्रक्रियेनंतर फार कमी वेदना झाल्या, गुडघ्याची ताकद सुधारली आणि हालचालीत लवकर सुधारणा झाली. कमी आक्रमक शस्त्रक्रिया असल्यामुळे त्यांना दुसऱ्याच दिवशी हॉस्पिटलमधून डिस्चार्ज देण्यात आला.

आपल्या भावना व्यक्त करताना पाल म्हणाले की, वर्षानुवर्षे वेदना सहन केल्यानंतर, ते आता वेदनांशिवाय चालू शकत आहेत आणि हालचाली करताना त्यांचा आत्मविश्वास परत आला आहे. शस्त्रक्रियेनंतर इतक्या लवकर वेदनांपासून आराम मिळेल, असे मला कधीच वाटले नव्हते. या उपचारामुळे मला खरोखरच नवीन आयुष्य मिळाले आहे, असे त्यांनी सांगितले.

एआय-चालित रोबोटिक घुडघा प्रत्यारोपणासारख्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे गंभीर संधिवाताने ग्रस्त असलेल्या रुग्णांना आता लवकर बरे होणे, अधिक चांगले उपचार परिणाम आणि वेदनामुक्त व सक्रिय जीवन जगण्याची नवी आशा मिळाली आहे.

## 'एक दिवस सैनिकासाठी' अभियानाला सुरवात

**अमरावती, ७जानेवारी :** देशसेवेतून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या आणि शहीद जवानांच्या कुटुंबियांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी 'एक दिवस सैनिकांसाठी' हे अभिनव अभियान सुरू केले आहे. २३ डिसेंबर २०२५ रोजी ध्वजदिन निधी संकलन कार्यक्रमात दिलेल्या आश्वासना नुसार, दर महिन्याचा पहिला मंगळवार हा माजी सैनिकांसाठी राखीव ठेवण्यात आला. या विशेष दिनानिमित्त जिल्हा प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांशी संवाद साधला. यावेळी उपविभागीय अधिकारी (भातकुली) दादासाहेब दराडे, उपविभागीय अधिकारी (दर्यापूर) राजेश्वर हाडे, अमरावतीचे तहसीलदार विजय लोखंडे, तहसीलदार अश्विनी जाधव (नांदगाव खंडेश्वर), तहसीलदार रवींद्र कानझडे (दर्यापूर) आणि जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर आनंद पाथरकर प्रामुख्याने उपस्थित होते'

## मोठ्या स्क्रिन आकाराच्या डिवाईसेसमध्ये प्रभावी कार्यक्षमतेची भर

# शाओमीकडून भारतात रेडमी नोट १५ ५जी आणि रेडी पॅड २ प्रो लाँच



**मुंबई, ७ जानेवारी :** शाओमी इंडिया या जागतिक तंत्रज्ञान ब्रँडने आज रेडमी नोट १५ ५जी आणि रेडमी पॅड २ प्रो यांच्या लाँचची घोषणा केली, जे दैनंदिन वापरासाठी विश्वासार्ह कार्यक्षमता, सर्वोत्तम मनोरंजन आणि दीर्घकालीन टिकाऊपणा देण्याकरिता डिझाइन करण्यात आले आहेत. भारतातील ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेल्या नवीन रेडमी डिवाईसेसमध्ये दिवसभर कार्यरत राहण्याची स्मार्टफोन क्षमता, तसेच मोठी स्क्रिन आहे, ज्यामुळे चालता-फिरताविनासायास कार्यक्षमता आणि घरामध्ये उत्साहवर्धक मनोरंजन व उत्पादकतेचा शोध घेत असलेल्या वापरकर्त्यांसाठी अनुकूल चॅम्पियन्स आहेत.

काम, प्रवास, पेमेंट्स, मनोरंजन व संवादासाठी सतत स्मार्टफोन्सचा वापर केला जात असलेल्या देशामध्ये रेडमी नोट १५ ५जी असा डिवाईस म्हणून डिझाइन करण्यात आला आहे, जेथे वापरकर्त्यांना खरेदी करताना इतर विचार करण्याची गरज भासणार नाही. वास्तविक जीवनात उपयुक्त ठरण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या रेडमी नोट १५ ५जी मध्ये सुधारित इंटर्नल्स, एमआयएल-एसटीडी-८१०एच चाचणी पद्धतींवर आधारित एसजीएस-चाचणीकेलेला टिकाऊपणा आणि आयपी६६ रेटिंग आहे, ज्यामुळे नकळतपणे डिवाईस खाली पडणे, पाण्याचे थेंब, धूळ आणि अनपेक्षित स्थितींपासून डिवाईसचे संरक्षण होण्यास मदत होते. हायड्रो टच २.० हाताची बोटे किंवा स्क्रिन ओलसर असताना देखील डिस्प्ले प्रतिसाद देण्याची खात्री देते, ज्यामुळे पाऊस, वर्कआऊट्स किंवा प्रवासादरम्यान डिवाईस विनाव्यत्यय वापरता येतो.

दैनंदिन फोटोग्राफीसाठी रेडमी नोट १५ ५जी मध्ये १०८ मेगापिक्सल मास्टरपिक्सल ड्युअल एआय कॅमेरा, जागतिक पदार्पण करण्यात आलेले सॅमसंग आयएसओसीईएलएल एचएम९ सेन्सर आहे. ऑप्टिकल इमेज स्टेबिलायझेशन (ओआयएस) सुस्पष्ट फोटोज व स्थिर ४के व्हिडिओ रेकॉर्डिंग कॅप्चर करण्याची सुविधा देते, तर ३ इन-सेन्सझूम उत्तम फोटो, पोर्ट्रेट्स व क्लोज-अप्सदरम्यानसुस्पष्टता कायम ठेवते. पुढील बाजूस २० मेगापिक्सल कॅमेरासह ऑटो फिल्ड-ऑफ-व्ह्यूॲडजस्टमेंट सुस्पष्ट, आकर्षक सेल्फी कॅप्चर होण्याची, तसेच व्हिडिओ कॉल्सची खात्री देते, तुमच्या एकट्याचा किंवा ग्रुपचा सेल्फी काढायचा असो त्याच्याशी जुळून जाते. एआय-समर्थितवैशिष्ट्ये जसे डायनॅमिक शॉट्स (लाइव्ह फोटो) आणि पोर्ट्रेट मोड्स वास्तविक रूपात क्षणांना कॅप्चर करतात.

शाओमी हायपरओएस २ वर संचालित रेडमी पॅड २ प्रो होम स्क्रिन+, शेअर्ड क्लिपबोर्ड, कॉल सिंक आणि नेटवर्क सिंक अशा वैशिष्ट्यांच्या माध्यमातून इतर शाओमी डिवाईसेसशी सहज कनेक्ट होतो, ज्यामुळे क्रॉस-डिवाईसकाम करणे सोपे होते. ५ वर्ष सॉफ्टवेअर अपडेट्स आणि ७ वर्ष सिक्युरिटी अपडेट्सच्या पाठबळासह हा टॅब्लेट शाओमी हायपरओएस ३ सुसज्ज आहे. या डिवाईसमध्ये गुगल जेमिनी व सर्कल टू सर्च देखील आहे, ज्यासह उत्पादकता व शोधक्षमता अधिक वाढली आहे, तसेच मायक्रोएसडीच्या माध्यमातून जवळपास २ टीबीपर्यंत विस्तार करण्यात येणारे स्टोरेज मनोरंजन, डॉक्यूमेंट्स व सर्जनशील प्रकल्पांसाठी व्यापक स्पेसची खात्री देते.

## गॅलेक्सी बुक६ च्या आकर्षक नवीन डिझाइनमध्ये एआय समर्थित उत्पादकता आणि प्रगत कार्यक्षमतेचा अनुभव घ्या

**मुंबई, ७ जानेवारी :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने आज सीईएस २०२६ दरम्यान गॅलेक्सी बुक६ अल्ट्रा, गॅलेक्सी बुक६ प्रो आणि गॅलेक्सी बुक६ लाँच केले. आतापर्यंतच्या सर्वात प्रगत गॅलेक्सी बुक सिरीजमधील या डिवाईसेसमध्ये उत्तम कार्यक्षमता आहे, जी परिपूर्णपणे संतुलित स्लिम प्रोफाइलमधील अचूक डिझाइनच्या माध्यमातून एआय-समर्थितउत्पादकता वाढवते.

''सॅमसंगमध्ये आमचा विश्वास आहे की, खरी नाविन्यता मुलभूत गोष्टी योग्य करण्यासह सुरू होते,'' असे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्समधील मोबाइल एक्स्पीरिअन्स (एमएक्स) बिझनेसचे अध्यक्ष, चीफ ऑपरेटिंग ऑफिसर (सीओओ) आणि आरअँडडी ऑफिसचे प्रमुख वोन-जूनचोई म्हणाले. ''गॅलेक्सी बुक६ सिरीजसह आम्ही विश्वासार्ह एआयच्या माध्यमातून अद्वितीय गती व क्षमतेला एकत्र केले आहे, ज्यामधून वापरकर्त्यांना सॅमसंगकडून अपेक्षित असलेली अपवादात्मक उत्पादकता व सर्जनशीलता क्षमता मिळतील.''

गॅलेक्सी बुक६ अल्ट्रा, गॅलेक्सी बुक६ प्रो आणि गॅलेक्सी बुक६ जानेवारी २०२६ च्या शेवटी निवडक बाजारपेठांमध्ये ग्रे किंवा सिल्व्हर रंगामध्ये उपलब्ध असतील. तसेच, गॅलेक्सी बुक६ एंटरप्राइज एडिशन देखील असेल, ज्यामध्ये व्यवस्थापित आयटी वातावरणासाठी सानुकूल केलेली वैशिष्ट्ये व सोल्यूशन्स असतील आणि हा डिवाईस एप्रिल २०२६ पासून विशिष्ट बाजारपेठांमध्ये उपलब्ध असेल.

## सॅमसंगकडून जगातील पहिल्या १३०-इंचमायक्रो आरजीबी टीव्हीचे अनावरण



**मुंबई, ७ जानेवारी :** सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सने आज सीईएस २०२६ मध्ये जगातील पहिल्या १३०-इंचमायक्रो आरजीबी टीव्ही (आर९५एच मॉडेल)चे अनावरण केले, ज्यासह त्यांचा सर्वात मोठा मायक्रो आरजीबी डिस्प्ले आणि अल्ट्रा-प्रीमियमडिस्प्लेंसाठी आकर्षक नवीन डिझाइन सादर केली आहे.

''मायक्रो आरजीबीमध्ये आमची सर्वोच्च पिक्चर क्वॉलिटी नाविन्यता आहे आणि नवीन १३०-इंच मॉडेल त्या दृष्टिकोनाला अधिक नव्या उंचीवर घेऊन जाते,'' असे सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्सच्या व्हिज्युअल डिस्प्ले (व्हीडी) बिझनेसचे कार्यकारी उपाध्यक्ष हुन ली म्हणाले. ''आम्ही दशकापूर्वी लाँच केलेल्या आमच्या मूळ डिझाइन तत्त्वामध्ये अधिक सुधारणा करत आहोत, ज्यासह आधुनिक काळातील पिढीला अद्वितीय प्रीमियम डिस्प्ले मिळेल, जो तंत्रज्ञानासह डिझाइन करण्यात आला आहे.''

## उत्सवातून गोंधळाकडे : राशीच्या लग्नामुळे पुष्पा भावनिकदृष्ट्या तुटली

**मुंबई, ७जानेवारी :** सोनी सब वरील पुष्पा इम्पॉसिबल प्रेक्षकांच्या मनात सतत घर करून आहे, कारण यात दाखवलेली पुष्पा (करुणा पांडे) हिची प्रेरणादायी कहाणी एका साध्या पण विलक्षण धैर्य असलेल्या स्त्रीची आहे. एक समर्पित गृहिणीपासून ते ठाम वकील होण्यापर्यंत, या मालिकेत तिच्या प्रवासाचे दर्शन घडते, जिथे ती प्रत्येक आव्हानाला सामोरी जाते, जीवनातील अडथळ्यांनी स्वतःला परिभाषित होऊ देत नाही आणि आपल्या श्रद्धा व चिकाटीवर ठाम राहते.

आगामी भागांमध्ये, पुष्पाची मुलगी राशी (अक्षया हिंदळकर) रिषभशी (श्रेय मराडिया) लग्न करते, आणि त्यात तीव्र नाट्य घडते. लग्नाआधी, स्वरा (परी भट्टी) ला संशय येतो की रिषभ राशीला खोट्या आश्वासनांनी गॅसलाइट करत आहे, ज्यात त्याने कधीही खरेदी करण्याचा विचार न केलेल्या फ्लॅटचे आश्वासनही आहे. तिच्या चिंता दुर्लक्षित झाल्यावर, संतापलेल्या स्वराने तितलीला (भूमी रामोला) घेऊन तिच्या आईकडे, कदंबरीकडे (बृंदा त्रिवेदी) तुरुंगात भेटायला जाते, ज्यामुळे लग्नात गोंधळ उडतो. कदंबरी तितलीला पटवते की तिच्या वडिलांच्या, जुगलच्या (अंशुल त्रिवेदी) मृत्यूला पुष्पाच जबाबदार आहे. त्यामुळे तितली घर सोडून विराजवळ (हेमंत खेर) राहायला जाते. तीन मुली तिच्यापासून दूर जात असल्याने पुष्पा एका वेदनादायी वळणावर उभी राहते.

या चालू ट्रॅकबद्दल बोलताना, पुष्पाची भूमिका साकारणारी करुणा पांडे म्हणाल्या, हा टप्पा पुष्पाच्या प्रवासातील सर्वात वेदनादायी अध्यायांपैकी एक आहे. आई म्हणून, आपल्या मुली दूर जाताना, आपल्याला गैरसमजून घेताना आणि त्यांना दुखावणारे निर्णय घेताना पाहणे खूपच हृदयद्रावक असते. पुष्पाने नेहमीच मजबूत, स्वावलंबी मुली घडवण्यावर विश्वास ठेवला आहे, पण येथे तिला जाणवते की सबलीकरण म्हणजे कधी हस्तक्षेप करून संरक्षण करणे हेही असते. हा ट्रॅक एका आईची शांत ताकद दाखवतो, जी आतून तुटत असली तरी आपल्या मुलांवर किंवा मूल्यांवर हार मानत नाही.

## सीमा ओलांडून हिंदी: भाषा, ओळख आणि नात्यांवर सोनी सब कलाकारांचे विचार



**मुंबई, ७ जानेवारी :** एका अशा जगात जिथे कथा, भावना आणि नाती खंड ओलांडून पसरतात, भाषा ही आपली सर्वात खोलवर रुजलेली मुळे ठरते. जगभरातील कोट्यवधी लोकांनी बोलली जाणारी हिंदी ही केवळ संवादाची माध्यम नाही; ती संस्कृती, इतिहास आणि अभिव्यक्तीची जिवंत परंपरा आहे जी प्रदेश आणि पिढ्यांमध्ये लोकांना एकत्र बांधते. जागतिक हिंदी दिन, जो हिंदीच्या जागतिक महत्त्वाला स्वीकारण्यासाठी आणि तिच्या समृद्धीला सीमांच्या पलीकडे नेण्यासाठी समर्पित आहे, या दिवशी सोनी सब चे प्रिय कलाकार या शाश्वत भाषेचा त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनात काय अर्थ आहे यावर विचार करतात.

अविनेश रेखी, जो गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मध्ये भगवान शिवाची भूमिका साकारतो, म्हणतो, जेव्हा मी सेटवर पाऊल ठेवतो, तेव्हा हिंदी आपोआप माझा भावनिक आधार बनते. शब्दांमधील थांबे, वाक्यातील सौम्यता किंवा ताकद, आणि एकाच भावातून संपूर्ण अर्थ कसा बदलू शकतो याकडे माझं लक्ष जातं. हिंदीच्या माध्यमातूनच मला पात्र खऱ्या अर्थाने जिवंत वाटतं. विश्व हिंदी दिनी मला हे जाणवतं की ही भाषा केवळ भूगोलापुरती मर्यादित नाही; ती शांतपणे जगभरातील हृदयांना आणि संस्कृतींना जोडते, ज्यामुळे वेगवेगळ्या ठिकाणचे लोक एकत्र येऊन तीच भक्ती, आनंद आणि भावना अनुभवू शकतात.

श्रेणू पारिख, जी गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मध्ये देवी पार्वतीची भूमिका साकारते म्हणाली, मला अजूनही आठवते की लहानपणी मी हिंदीतील कथा आणि श्लोक ऐकत असे, जे सांगितल्यानंतरही माझ्या मनात बराच काळ राहिले. कालांतराने मला जाणवले की हिंदी ही फक्त आपण बोलतो ती भाषा नाही, ती आपण अनुभवतो ती भावना आहे. अभिनेत्री म्हणून, ती मला पार्वतीच्या भावनिक केंद्रापर्यंत पोहोचायला मदत करते आणि देशभरातील प्रेक्षकांशी जोडते. जागतिक हिंदी दिनी मी अशा भाषेचा उत्सव साजरा करते जी घरासारखी वाटते आणि तरीही सर्वांची आहे.

सुम्बुल तौकीर खान, जी इत्ती सी खुशी मध्ये अन्विता ची भूमिका साकारते, म्हणाली, हिंदी ही अशी भाषा आहे जी घरासारखी वाटते आणि तरीही सर्वांची आहे, यात काहीतरी विलक्षण स्थिरता आहे. हिंदीमध्ये ती ताकद आहे, जी प्रदेश, उच्चार आणि पार्श्वभूमी ओलांडून प्रवास करते, आणि सर्वत्र तीच ऊब आणि भावनिक खोली घेऊन जाते. आपल्या अधिकृत भाषांपैकी एक म्हणून, ती समावेशकता आणि ओळख यांना सुंदरपणे एकत्र आणते. जागतिक हिंदी दिनी मला हिंदीत सांगितल्या जाणाऱ्या कथांचा भाग असल्याचा अभिमान वाटतो, कारण त्या केवळ मनोरंजन करत नाहीत; त्या आपल्याला जोडतात, दिलासा देतात आणि आपण कोण आहोत याशी आपल्याला जोडून ठेवतात.

## गुरूवार दि. ८ जानेवारी २०२६

| कल्याण बाजार पत्थर फोड एकच | | | | मुंबई बाजार पत्थर फोड एकच | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ६ | ९ | २ | ५ | ६ | ७ |
| २४६ | ६७० | १७८ | २७० | १५६ | १५९ | २७७ | १६० |
| ५८९ | ३५५ | ३५८ | ४६९ | ४८० | २५८ | ३३० | ३४० |
| ६७९ | २४७ | २७७ | ३७९ | ३९० | ३५७ | ११४ | ८९० |

| जोडी | जोडी |
|---|---|
| २१ - ३१ - ६० - ९० | २९ - ५९ - ६१ - ७१ |
| २५ - ३५ - ६८ - ९८ | २० - ५० - ६८ - ७८ |
| २७ - ३७ - ६४ - ९४ | २२ - ५५ - ६४ - ७५ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस ८ जाने. २०२६

## गुरूवार दि. ८ जानेवारी २०२६

## आजचे राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस तुमच्यासाठी फायदेशीर असेल. व्यवसायात नफा मिळण्याची शक्यता आहे. खूप पूर्वी उधार दिलेले पैसे आज परत मिळतील. तुमची तब्येत, आरोग्य आधीपेक्षा सुधारेल.

**वृषभ :** आजचा दिवस जुन्या कल्पना सोडून नवीन कल्पना स्वीकारण्यासाठी शुभ आहे. ही कल्पना पाहून तुमचे कुटुंब उत्साहाने भरून जाईल. तुम्ही आज घरी तुमचा आवडता पदार्थ देखील बनवून खाण्याचा आनंद घ्याल.


**मिथुन :** आज तुम्हाला आवडीचे लोक भेटतील. त्यांच्याशी गप्पा मारून वेळ आनंदात जाईल.ओळखीच्या लोकांना उधार दिलेले पैसे आजच्या दिवशी परत मिळतील. आज तुम्ही नवीन मालमत्ता खरेदी कराल.

**कर्क :** आज कोणतेही काम पूर्ण करताना तुम्हाला अनेक महत्त्वाच्या आव्हानांना सामोरे जावे लागेल. तुम्ही त्यांना संयमाने तोंड द्याल आणि ते काम पूर्ण कराल.

**सिंह :** आज, तुम्ही अशा लोकांना प्राधान्य द्याल ज्यांनी तुम्हाला इतकी प्रगति करण्यास मदत केली आहे, ते म्हणजे तुमचे पालक आणि शिक्षक. त्यांच्याशी प्रेमाने वागाल. मित्र आणि काम यांच्यात संतुलन राखावे लागेल.

**कन्या :** व्यावसायिकांना आज नवीन करार मिळू शकतो.

## शब्दकोडे क्रमांक २३२१



६६) खिडकीची पातळ काच

**उभे शब्द :-**

१) तरुण सुंदर स्त्री
२) आशीर्वादाचा हात
३) मिठी, विळखा
४) दोन बिंदूतील जागा, फरक
५) छांदिष्ठ
६) शक्तिशाली
७) दूध वा दुधाचे पदार्थ
८) शहर
११) रागांतील दुय्यम प्रमुख स्वर
१३) दरवाजा
१५) पाण्यावरील तरंग
२९) त्रासदायक बडबड
३१) चामखीळ
३५) मोदकाचे आच्छादन
३६) पुन्हा
३७) गाडीचे छत
३९) पंकज
४१) उकळत्या पाण्याचा आवाज
४३) पाठवणी
४४) वाळवी
४५) प्रजा
४७) सुगंध
४८) ठेकेदार
४९) बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५२) पाठविलेला

# 12 रोजगार सेवक, दोन तांत्रिक अधिकारी निलंबित

## दहेंद्री येथील शेतकऱ्यांना दुबार लाभ दिल्याचे प्रकरण




**महासागर प्रतिनिधी**

**चिखलदरा, (दि.7)**- तालुक्यातील दहेंद्री गावातील शेतकऱ्यांना दुबार लाभमिळवून दिल्याप्रकरणी दोन तांत्रिक अधिकारी तसेच तब्बल 12 रोजगार सेवकांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. त्यामुळे मेळघाटात चांगलीच खळबळ उडाली आहे.

पूर्वी अस्तित्वात असलेल्या सिंचन विहिरी दाखवून आधी लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांना दुबार लाभ पोहोचून त्याच विहिरीवर जिओ टॅगिंग करणे, कामाचे हजेरीपत्रक निर्गमित करणे, मूल्यांकन करणे असा त्यांच्यावर ठपका आहे. या प्रकरणात तांत्रिक अधिकारी अजय अमोदे व तांत्रिक सहायक अंकिता बेलकर हे दोषी आढळून आल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. तसेच दहेंद्री येथील ग्रामपंचायत सरपंच व सचिव यांना विशेष ग्रामसभा आयोजित करून सर्व 12 रोजगार सेवकांना कमी करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी एका आदेशान्वये दिले आहेत.

चिखलदरा तालुक्यातील दहेंद्री ग्रामपंचायत अंतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काहींनी 2015-16 व 2016-17 या आर्थिक वर्षांमध्ये मग्रारोहयोतून सिंचन विहिरीचा लाभ घेऊन पुन्हा 2023-24 या आर्थिक वर्षामध्ये दुबार लाभ घेतला. कामाच्या प्राप्त प्रस्तावातील दस्तऐवजातील पडताळणी करणे, पडताळणीअंती परिपूर्ण प्रस्तावाच्या अनुषंगाने मंजुरीकरिता नस्ती सादर करणे, अशाप्रकारची कामे सहायक कार्यक्रम अधिकारी यांच्या कार्यसूचीमध्ये येतात. त्यामुळे यास सहायक कार्यक्रम अधिकारी नितीन शिरभाते अंशतः दोषी आढळून येत असल्याने त्यांना एक हजार रुपये दंड ठोठावला आहे. भविष्यात अशा प्रकारची चूक होऊ नये म्हणून ताकीद देण्यात आली आहे.

### सिद्धार्थ वानखडे यांची होती तक्रार

मग्रारोह योजनेत घोटाळा झाल्याप्रकरणी सिद्धार्थ वानखडे यांनी 30 मे 2025 रोजी, तर यश येवले यांनी 11 जून 2025 रोजी गटविकास अधिकारी, तहसीलदार तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. त्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली. याप्रकरणात 12 रोजगार सेवक व दोन तांत्रिक अधिकारी दोषी आढळल्याचे सिद्ध झाले आहे.

"एकदा लाभ घेऊनही पुन्हा मग्रारोह योजनेत दुबार लाभ घेतल्याप्रकरणी 12 शेतकऱ्यांच्या सातबारावर बोजा चढविण्याचे आदेश तहसीलदार व गटविकास अधिकारी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी एका आदेशान्वये दिले आहेत. 6 सदरची कार्यवाही दोन आठवड्यांपूर्वी झाली असून संबंधित व्यक्तींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

**संजिता महापात्र,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. अमरावती**

# महसूल नायब तहसीलदारांना अवैध वाळू तस्करी दिसेना?

### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तस्करांचे फावतेय



**महासागर प्रतिनिधी**


**चांदूर बाजार,(दि.7)**- तालुक्यातील विविध नदीपात्रांतून सर्रास सुरू असलेली अवैध वाळू तस्करी महसूल प्रशासनाला कशी काय दिसत नाही, असा गंभीर सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. दिवसाढवळ्या नदीपात्रातून वाळू उपसा करून ट्रॅक्टर-ट्रॉली व हायवा वाहनांद्वारे खुलेआम वाहतूक सुरू असतानाही महसूल नायब तहसीलदारांकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप होत आहे.

विशेष म्हणजे, रात्रीच नव्हे तर दिवसा देखील अवैध वाळू वाहतूक सुरू असतानाही महसूल विभागाकडून केवळ औपचारिक तपासण्या आणि कागदी कारवाई केल्याचे चित्र आहे. 'सामान्य नागरिकांना उघडपणे दिसणारी तस्करी महसूल अधिकाऱ्यांना कशी दिसत नाही?' असा संतप्त प्रश्न ग्रामस्थ विचारत आहेत.

स्थानिक सूत्रांच्या माहितीनुसार, गेल्या अनेक महिन्यांपासून संबंधित भागात अवैध वाळू उपसा सुरू असून अद्याप कोणतीही प्रभावी व मोठ्या प्रमाणावरची कारवाई झालेली नाही. परिणामी शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून पर्यावरणाचेही गंभीर नुकसान होत आहे. नदीपात्र अधिक खोल होत असल्याने भविष्यात पूरस्थितीचा धोका वाढण्याची शक्यता पर्यावरणतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

दरम्यान, अवैध वाळू तस्करीवर कारवाई का होत नाही, यामागे केवळ दुर्लक्ष आहे की आर्थिक संगनमत, असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. तातडीने कठोर कारवाई न झाल्यास उच्चस्तरीय चौकशीची मागणी करण्याचा इशारा स्थानिक नागरिक व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



**अमरावती** - नांदगावपेठ पोलिस स्टेशन हद्दीतील अर्जुननगर पोलिस वसाहतीमधील रचना अपार्टमेंटमध्ये राहणारे विजय वसंतराव इंगळे (37) यांनी त्यांच्या बेडरूममध्ये छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना सोमवारी उघडकीस आली. आत्महत्येमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. या प्रकरणी ग्रामीण जिल्हा अधीक्षक कार्यालयात कार्यरत असलेले अजय वसंतराव इंगळे यांच्या जबाबावरून नांदगावपेठ पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला सवलतीच्या प्रस्तावांना वाढीव मुदत

### 31 जानेवारी अंतीम मुदत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,(दि.7)** - शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या आणि लोककला प्रकारात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्याध्ययन सवलतीसाठी अतिरिक्त गुण देण्याची कार्यवाही शासन निर्णयानुसार शिक्षण मंडळामार्फत करण्यात येते. इयत्ता दहावीच्या माहे फेब्रुवारी-मार्च 2026 च्या परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे यासंबंधीचे प्रस्ताव माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्यासाठी 31 जानेवारी 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याची सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन पुणे राज्यमंडळाचे सचिव दीपक माळी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

यापूर्वी शासन निर्णयानुसार सदर विषयासंबंधीचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी संबंधित माध्यमिक शाळेकडे 15 डिसेंबरपर्यंत व शाळांनी ते प्रस्ताव विभागीय मंडळाकडे 15 जानेवारीपर्यंत सादर करण्याबाबत सूचीत करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी पत्रान्वये कळविल्यानुसार, शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा 2025 चा निकाल जानेवारी 2026 च्या शेवटच्या आठवड्यात जाहीर होणार आहे. त्यामुळे शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला विषयक प्रस्ताव वेळेत सादर करणे शक्य नसल्याने, या वर्षापुरती विशेष बाब म्हणून मुदतवाढ देण्यात आली आहे.



# नगर पालिकेत पत्रकार दिन सोहळा साजरा

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि.7)** - मराठी भाषेतील आद्य पत्रकार तथा 'दर्पण'चे संस्थापक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकार दिन सोहळा दि. 6 जानेवारी रोजी मोर्शी नगरपालिकेच्या सभागृहात उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने व नगरसेवक रवींद्र गुल्हाने यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महादेव नवघरे होते. व्यासपीठावर नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने, नगरसेवक रवींद्र गुल्हाने, डॉ. प्रदीप कुऱ्हाडे, भूषण कोकाटे, सागर ठाकरे, पत्रकार विजय सोमवंशी व अंबादास सिनकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोर्शी शहरासह तालुक्यातील पत्रकार बांधवांचा पेन, डायरी व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमात नगराध्यक्षा प्रतीक्षा गुल्हाने, नगरसेवक रवींद्र गुल्हाने तसेच पत्रकार अजित जोशी, संजय गारपवार, गोपाल डहाके व शरद कनेर यांनी आपले विचार मांडले. पत्रकारांनी समाजप्रबोधन व लोकशाही बळकट करण्यातील भूमिकेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीकांत सिनकर यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेश ठाकरे यांनी केले. यावेळी अजय पाटील, गजानन हिरुळकर, दिनेश मिश्रा, अरुण जोशी, बाबुराव पडोळे, विकास पाटील, नरेंद्र सोनागोते, जितेंद्र श्रीनाथ तसेच नगरपालिकेचे प्रशासन अधिकारी अमोल ढोले व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय सेवा देणाऱ्या पत्रकारांचा गुणगौरव व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषदेचे सेवानिवृत्त व राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक भाऊराव नाचोणे यांच्या निवासस्थानीही पत्रकारांचा भेटवस्तू व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षिका रेखा नाचोणे उपस्थित होत्या.

# पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांची पुण्यतिथी साजरी

### माईच्या सामाजिक कार्याचा सूर्य मेळघाटातच उगवला होता जुन्या आठवणींना उजाळा



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,(दि.4)** - महाराष्ट्रातील थोर समाजसेविका पद्मश्री डॉ. स्व. सिंधुताई सपकाळ (माई) यांची चौथी पुण्यतिथी चिखलदरा येथे श्रद्धा व आदराने साजरी करण्यात आली सिंधुताई सपकाळ जनविकास सामाजिक बहुउद्देशीय फाऊंडेशन, पुणे ब्रँच शाखा चिखलदरा यांच्या वतीने आयोजित 'चौथी पुष्प-शब्दांजली' कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी माईच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी लेडी गव्हर्नर आचार्य डॉ. कमल रा. गवई उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये आमदार केवलराम काळे (मेळघाट), न्यायमूर्ती प्रभाकर मोडक (सहजिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर), माजी आमदार प्रभूदास भिलावेकर, उपवनसंरक्षक कीर्ती जमदाडे-कोकाटे (ड्रूस्न्स), पियुष कोल्हे (प्रिन्सिपल कमिशनर, आयकर), सुनील मानकर (वॉरंट ऑफिसर, एअर फोर्स), नगराध्यक्ष शेख अब्दुल शेख हैदर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी माईच्या संघर्षमय जीवनप्रवासावर आणि अनाथ, वंचित मुलांसाठी केलेल्या अमूल्य कार्यावर वक्त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे आयोजन माईचे चिरंजीव अरुण सपकाळ यांनी केले. चिखलदरा ही माईची कर्मभूमी मानली जाते. येथूनच त्यांनी सामाजिक कार्याची सुरुवात करत आदिवासी मुलींसाठी आश्रमशाळा सुरू केली. शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आदिवासी मुलींना आणण्याचा त्यांचा प्रयत्न आजही प्रेरणादायी आहे. माईचे कार्य पुढे नेण्याचा संकल्प आपण करत असल्याचे अरुण सपकाळ यांनी यावेळी सांगितले.

# हिवरखेड ग्राम वाचनालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड,(दि.7)** - स्त्री शिक्षणाच्या जननी व देशातील पहिल्या महिला शिक्षिका क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती हिवरखेड ग्राम वाचनालयात अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. सामाजिक प्रबोधनाचा वारसा जपत वाचनालयाने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास पदाधिकारी, सदस्य व वाचकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी वाचनालयाचे अध्यक्ष नानासाहेब रा. धरमकर यांनी सावित्रीबाईंच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकत, अनेक अपमान, दगड-शेण सहन करूनही सावित्रीबाईंनी शिक्षणाची ज्योत अखंड तेवत ठेवली. त्यांच्या कार्यामुळेच आज महिला प्रत्येक क्षेत्रात प्रगती करत आहेत, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमात सचिव साहेबराव बा. निंभेकर, सदस्य पंजाबराव ढोरे, सुभाषराव वारणकर, देवेंद्रगोरडे, रमेशचंद्र गांधी तसेच वाचनालयाचे कर्मचारी पंकज वा. भडके (लिपिक) व भुषण सा. बेलसरे (शिपाई) यांची उपस्थिती लाभली. वाचकांनी सावित्रीबाईंच्या साहित्याचे व कवितांचे वाचन करून कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला. ग्रामीण भागातील मुला-मुलींमध्ये शिक्षणासोबत वाचनाची गोडी कशी वाढवता येईल, यावर प्रेरणादायी चर्चा झाली. कार्यक्रमाचा समारोप देवेंद्र गोरडे यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. त्यांनी उपस्थितांना नववर्षाच्या शुभेच्छाही दिल्या.

# वीज चोरी विरोधातील कारवाई केवळ दिखावा?

### वरिष्ठ स्तरावरुन चौकशी कधी?

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,(दि.7)**- चांदूरबाजार उपविभागातील महावितरण कार्यालयाच्या हद्दीत वीजचोरीविरोधात जोरदार धाडसत्रे, कारवायांच्या घोषणा आणि प्रसिद्धी झळकत असली, तरी प्रत्यक्षात ही कारवाई कागदावरच मर्यादित असल्याचा संशय बळावत आहे. वीजचोरीची प्रकरणे उघडकीस येत असतानाही त्यानुसार दंडात्मक कारवाई, गुन्हे दाखल होणे किंवा कडक शिक्षा होताना दिसत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, काही अधिकारी आणि खासगी कंत्राटदारांमध्ये 'सांठगाठ' असून वीजचोरीची प्रकरणे आर्थिक देवघेवीतून मिटवली जात असल्याची चर्चा आहे. राजकीय दबावाचा आधार घेऊन अनेक प्रकरणांची 'सेटलमेंट' केली जात असल्याने कायद्याची पायमल्ली होत असल्याचा आरोप आहे.

या सर्व प्रकारांकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे हेतुपुरस्सर दुर्लक्ष होत असल्याचे चित्र असून, साधी प्राथमिक चौकशीसुद्धा केली जात नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे. विशेष म्हणजे, महावितरणमधील काही बाह्य स्त्रोत कर्मचारी सोलर कंपन्यांचे एजंट म्हणून काम करत असल्याचेही उघड झाले आहे. ग्राहकांची दिशाभूल करणे, सोलर बसवण्यासाठी दबाव टाकणे आणि वीजचोरी प्रकरणांत मध्यस्थी करणे, हे प्रकार माहित असूनही कारवाई होत नाही, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

'कारवाई सुरू आहे' असे सांगून वरिष्ठ अधिकारी जबाबदारी झटकत असल्याचा आरोप होत असून, प्रत्यक्ष चौकशी, निलंबन किंवा गुन्हे दाखल करण्याचे धाडस कोण करणार, असा संतप्त सवाल चांदूरबाजारकर करत आहेत.


## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाने,

मिळकतीचे वर्णनः मौजे तारखेडा, प्रगणे बडनेरा, सर्वे क्रं. 41, प्लॉट क्रं. 13, ग्राउंड फ्लोअर वरील दुकान क्रं. 4, संकल्प हाईट पीआर कार्ड नुसार नझूल शीट क्रं. 51, नझूल प्लॉट क्रं. 12, ता. आणि जिल्हा. अमरावती.

सदर मिळकत माझे पक्षकार श्री. शशांक केशवराव हिवसे यांच्या मालकीची आहे. तदनंतर सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदी खत दि. 29/06/2017 रोजीचे दस्त क्र. 1689 आणि खरेदी खत दि. 08.12.2020 रोजीचे दस्त क्र. 2788 हे मुळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या 7 दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही हि विनंती.

कोर्ट शिक्का

आपला
ADVOCATE
रवींद्र रू. वाटाणे
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती
मो. नं. 9823698745



## जाहिरात

जन्म प्रमाण पत्र मिळने बाबत निशा रमेशचंद्र मालवीय रा. धुळघाट रोड ता. धारणी यांचा जन्म दिनांक 15/06/1981 रोजी गांव धुळघाट रोड ता. धारणी येथे झालेला आहे. या बाबत ग्राम पंचायतमध्ये नोंद नाही परंतु यांना जन्म दाखल्याची आवश्यकता आहे. करिता कोनाला या बाबत आक्षेप असल्यास त्यांनी 30 दिवसात आक्षेप दाखल करावे. सदर प्रसिद्धि ग्रामपंचायत धुळघाट रोड ता. धारणी येथे नोटिस बोर्ड वर लावण्यात आली आहे.

**निशा रमेशचंद्र मालवीय**


# राज्यातील 'झेडपी'च्या 12 हजार शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदलीचा मुहूर्त अखेर गवसला

- प्रहार शिक्षक संघटनेच्या इशाऱ्याने ग्रामविकास विभाग ॲलक्टिव्ह मोडवर
- शिक्षक भरतीपूर्वीच बदली प्रक्रिया राबविण्याचा निर्णय



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी, (दि. 7)** - जिल्हा परिषद अंतर्गत कार्यरत शिक्षक संवर्गाची मागील तीन वर्षांपासून रखडलेली आंतरजिल्हा बदली प्रक्रिया अखेर मार्गी लागण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. प्रहार शिक्षक संघटनेने मुंबईतील आझाद मैदानावर तीव्र आंदोलनाचा इशारा दिल्यानंतर ग्रामविकास विभाग ॲक्टिव्ह मोडवर आला आहे.

राज्याध्यक्ष महेश ठाकरे यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेत ग्रामविकास विभागाने आंतरजिल्हा बदली प्रक्रियेचा सातवा टप्पा लवकरच सुरू करण्याचे संकेत दिले आहेत. याबाबत ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव यांनी 6 जानेवारी रोजी सायंकाळी 5 वाजता राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बैठक घेऊन आवश्यक सूचना निर्गमित केल्या.

या प्रक्रियेत शिक्षक भरतीपूर्वीच आंतरजिल्हा बदली राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. नवीन संचमान्यता 2025-26 नुसार जिल्हा परिषदांमध्ये सुमारे 6 हजार रिक्त जागा असून सुमारे 2 हजार शिक्षक अतिरिक्त आहेत. 31 मे 2026 अखेर संभाव्य रिक्त पदे गृहीत धरून बदली प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. सातवा टप्पा पूर्ण झाल्यानंतर जिल्हा अंतर्गत बदली प्रक्रियेला सुरुवात होणार असून, त्यानंतरच 'पवित्र' पोर्टलवर शिक्षक भरतीसाठी जाहिराती प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. यामुळे तब्बल 12 हजारांहून अधिक शिक्षकांना आपल्या स्वगृही जिल्ह्यात परतण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. प्रहार शिक्षक संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा महत्त्वाचा टप्पा गाठण्यात यश आले आहे.

तीन वर्षांपासून रखडलेल्या आंतरजिल्हा बदली प्रक्रियेला गती मिळाल्याने 12 हजार शिक्षकांना न्याय मिळणार आहे. मात्र संघटनेचा पाठपुरावा सुरूच राहील.

**महेश ठाकरे,**
**राज्याध्यक्ष,**
**प्रहार शिक्षक संघटना**

### प्रमुख मागण्या

- आंतरजिल्हा बदलीचा सातवा टप्पा तातडीने कार्यान्वित करावा
- सर्व जिल्हा परिषदांनी शिक्षक संवर्गाचे रोस्टर अद्यावत करावे
- पेसा क्षेत्रात 20 टक्के व नॉन-पेसा क्षेत्रात 80 टक्के रिक्त पदे उपलब्ध करावीत
- उर्दू माध्यमाच्या रिक्त पदांचे प्रवर्गानुसार परावर्तन करावे
- 31 मे 2026 पर्यंतची रिक्त पदे गृहीत धरावीत
- बदलीसाठी स्वतंत्र वेळापत्रक जाहीर करावे
- शिक्षक भरतीपूर्वी आंतरजिल्हा बदली प्रक्रिया पूर्ण करावी


RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati

Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

# भक्तिमार्ग

## का कोमजते तुळस?

पूजासामग्रीमध्ये तुळशीला अत्यंत महत्त्व असतं. अनेकांच्या घरात कुंडीत, वृंदावनात तुळशीचं रोप असतं. त्याचं पावित्र राखलं जातं. रोपट्याला नियमित पाणी घातलं जातं. नीट देखभाल केली जाते. हवेशीर आणि भरपूर प्रकाश असणाऱ्या जागेत ते रुजवलं जातं.

असं असूनही कधीकधी तुळस कोमेजते. रोप सुकतं. वेदांमध्ये याबाबतची कारणं देण्यात आली आहेत. याविषयी जाणून घेऊ या.

✲ विविध कारणांसाठी तुळशीची पानं तोडली जातात. पानं तोडण्याची विशिष्ट पद्धत आहे. वेदांनुसार तुळशीची पानं एक एक करून तोडावी. असं न केल्यास तुळस कोमेजण्याची शक्यता असते.

✲ तुळशीच्या रोपाची निगा राखताना, कुंडीतील माती मोकळी करताना सुरी किंवा कात्रीचा वापर टाळावा.

• जाणून घ्या •



✲ पहाटे चार ते सायंकाळी ४ या वेळेतच तुळशीची पानं तोडावी. या वेळेनंतर तुळशीची पानं तोडणं योग्य नसतं.

✲ द्वादशीला तुळशीची पानं तोडू नयेत.

✲ तुळशीची पानं तोडण्यासाठी उजव्या हाताचा वापर करावा. डाव्या हाताने पानं तोडणं अयोग्य असल्याचं वेद सांगतात.


या नियमांचं पालन केलं तर तुळशीचं रोप जास्त काळ जगू शकेल.

## त्रिचीचं पहाडी किला मंदिर



तामिळनाडूतल्या त्रिची शहरात गणपतीचं एक मंदिर आहे. 'पहाडी किला मंदिर' या नावाने ते ओळखलं जातं. चैल राजांनी डोंगर फोडून हे मंदिर बांधलं. मंदिर पर्वताच्या शिखरावर असल्याने इथल्या गणपतीला 'उच्ची पेल्लीयार' असं म्हटलं जातं. तिथे जाण्यासाठी ४१७ पायऱ्या चढाव्या लागतात. इथला गणपती पूर्वमुखी आहे. या मंदिराच्या जवळच शंकर-पार्वती आणि लक्ष्मीची मंदिरंही आहेत. या देवतांचं दर्शन घेऊन मगच भक्त पुढे कूच करतात. उंचीवर असणाऱ्या या मंदिरात जाण्यासाठी भाविकांची बरीच गर्दी असते. गणेशाचं दर्शन घेतल्यानंतर लोकांचा थकवा कुठल्या कुठे पळून जातो. या मंदिराच्या उत्तरेकडून पवित्र कावेरी नदी वाहते. कोणत्याही वास्तूच्या उत्तरेकडून नदी वाहत असेल तर तिला खूप प्रसिद्धी मिळते, असं म्हटलं जातं. मदुराईचं मीनाक्षी मंदिर, श्रीरंगनाथ स्वामी मंदिर, कंठेश्वरा मंदिर ही काही उदाहरणं आहेत. हे मंदिरही त्यातीलच एक आहे. हा वास्तूशास्त्राचा उत्तम नमुना म्हणता येईल. दगड फोडून या मंदिराची निर्मिती करण्यात आल्याने हे स्थान भाविकांच्या आकर्षणाचं केंद्र ठरतं नयररम्य परिसर त्यांना आकर्षित करतो. पर्वतशिखरावरून त्रिची शहराचं विहंगम दर्शन घडतं.

• पर्यटन •



## यातून काही तरी शिका

तत्वज्ञान यातून काही तरी शिका आयुष्यात मार्ग दाखवू दाखवणारी, सकारात्मक वृत्ती वाढवणारी अनेक वचनं संत, महात्मे आणि प्रसिद्ध व्यक्तींनी लिहून ठेवली आहेत. यातून आपण बरंच काही शिकू शकतो. आयुष्यात प्रगती करू शकतो. अशाच काही वचनांविषयी...

✲ स्वत:वर नियंत्रण ठेवणं हाच माणसाचा सर्वात मोठा विजय आहे असं प्लेटोने सांगितलं आहे.

✲ जीवनात सत्य आणि ज्ञानाची अनुभूती करून देण्याचं काम गुरू करतात. गुरूने सांगितलेल्या मार्गावर चालल्याने आपण भवसागरही पार करू शकतो, असं महाराज कमलबीर यांनी सांगून ठेवलं आहे.

✲ आळसामुळे आपण पंगू बनतो. ही वृत्ती सोडली तरच आयुष्यात किर्ती, प्रतिष्ठा, मानसन्मान मिळतो. मेहनतीशिवाय जगात काहीही मिळत नाही, असं डॉ. रामचरण महेंद्र सांगतात.

✲ बावा लालजी अध्यात्माची महती सांगतात. ते म्हणतात, अध्यात्मामुळे दगडाचं सोनं होऊ शकतं. म्हणजे अध्यात्म अज्ञानी माणसाला ज्ञानाची दिशा दाखवण्याचं काम करतं. मनोविकार दूर करण्याची क्षमता अध्यात्मात असते.



✲ आपण आपल्यामधले अवगुण दूर करण्याचा प्रयत्न करायला हवा. इतरांमधले दोष शोधण्यातच आपलं आयुष्य संपून जातं. यामुळे आपण स्वत:मधले दोष तपासून दूर करू शकत नाही, असं डॉ. प्रशांत अग्रवाल यांनी सांगितलं आहे.

✲ चुकांना घाबरू नका. चुका केल्या नाहीत तर काही नवं शिकता येणार नाही, असं डॉ. जेम्स डाव्सन म्हणतात.

• करियर •

✲ परोपकारांमुळे मन:शांती मिळते. त्यामुळे समाजातल्या वंचितांची सेवा करत रहा, असं आनंदस्वामी महाराज सांगतात.

## लाभ नम्रतेचे...


नम्रता, विनयशीलता हा अत्यंत उपयुक्त असा गुण आहे. या गुणामुळे आपण बरंच काही मिळवू शकतो. नम्र स्वभावामुळे काय साध्य करता येतं याविषयी...

✲ आपलं आणि इतरांचं भलं करणारी व्यक्ती महान ठरते. ज्यांच्या कर्मांची दीर्घकालीन चांगली फळं चाखायला मिळतात, त्यांचा उदोउदो केला जातो. महान लोक जगाकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतात. महान बनण्यासाठी विनयशील स्वभाव असणं गरजेचं असतं. नम्रता आपल्याला महान बनवू शकते.

✲ आयुष्यात बरंच काही मिळवल्यानंतर अहं बळावतो. पण अहंकार घातकच ठरतो. विनम्र स्वभावामुळे आपण या अहंकारावर मात करू शकतो. अहंकाराला काही पावलांवर रोखू शकतो.

✲ विचारांमध्ये प्रचंड शक्ती असते. सकारात्मक विचार आयुष्य बदलू शकतात. चांगल्या विचारांमुळे परमेश्वर खूश होतो तसंच अनेकांचे आशीर्वाद मिळतात. हे आशीर्वाद आयुष्याच्या विविध टप्प्यांवर उपयुक्त ठरू शकतात.

✲ नम्रपणा लोकांना आवडतो. आपलं कौतुक




• स्वमदत •

होतं. तोंडावर नम्र माणसाची स्तुती केली गेली नाही तरी मागे आठवण काढली जाते. त्याच्या नम्रतेचे गोडवे गायले जातात. कोणत्याही परिस्थितीत स्वत:ला सावरणारा मनुष्य श्रेष्ठ ठरतो.

✲ स्वभाव नम्र असेल तर सर्वांशी चांगले संबंध राहतात. अशी व्यक्ती फक्त माणसांशीच नाही तर प्राणीमत्रांशीही जोडली जाते. अशी व्यक्ती कायम आनंदी राहते. इतरांनाही आनंद देते.

## अशी हवी एकाग्रता



स्वामी विवेकानंदाच्या बाबतीत घडलेल्या एका घटनेतून आपण बोध घेऊ शकतो. स्वामीजींना वाचनाची खूप आवड होती. ग्रंथालयांमध्ये जाऊन ते पुस्तकं वाचत असत. एके दिवशी ग्रंथपालाने विवेकानंदांबाबत एक वक्तव्य केलं. स्वामीजी ग्रंथ वाचतात का बघून परत देतात, असं तो म्हणाला. स्वामी अखंडानंद त्यावेळी उपस्थित होते. ग्रंथपालाने व्यक्त केलेले विचार त्यांनी स्वामीजींच्या कानावर घातले. यानंतर विवेकानंद स्वत: त्या ग्रंथपालाला भेटायला गेले आणि म्हणाले, मी सगळी पुस्तकं वाचतो. तुम्हाला शंका असेल तर प्रश्न विचारा.

ग्रंथपालाने स्वामीजींना अनेक प्रश्न विचारले आणि त्यांनी सगळ्या प्रश्नांची अचूक उत्तरं दिली. यामुळे ग्रंथपाल हरखून गेला. स्वामीजी पटापट पुस्तकं वाचून काढतात. हे त्यांना कसं जमतं, असा प्रश्न त्याला पडला. याबाबत त्याने स्वामीजींना विचारलं.


• बोध •

त्यावर ते म्हणाले, नुकतंच लिहायला-वाचायला शिकणारं लहान मूल एकेक अक्षर अनेकदा वाचतं आणि लिहितं. त्यावेळी त्याची नजर एकाच अक्षरावर असते. बराच अभ्यास केल्यानंतर ते मूल संपूर्ण वाक्य वाचू शकतं. अशाच प्रकारे मी एकाच नजरेत पुस्तकाचं संपूर्ण पान वाचून काढतो. अभ्यास, ब्रह्मचर्य आणि एकाग्रतेमुळे हे शक्य होत असल्याचं स्वामीजींनी सांगितलं. या कौशल्याने स्वामीजींनी अनेकांना आश्चर्याचा धक्का दिला आहे. मानवता आणि चारित्र्याची निर्मिती न करणारं शिक्षण व्यर्थ असल्याचं स्वामीजींचं मत होतं.

## सुखी आयुष्याचं गमक

नैराश्य, अडथळे, अडचणी प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतात. यामुळे खचून जायचं नसतं तर सकारात्मक विचारांनी आयुष्य जगायचं असतं, हे सांगणारी ही काही उदाहरणं...

नैराश्याने ग्रासलेली एक व्यक्ती अरस्तू यांच्याकडे आली. आयुष्याचा कंटाळा आला असल्याचं आणि मरायची इच्छा असल्याचं त्याने अरस्तूंना सांगितलं. अरस्तू आपल्याला मदत करतील, मार्ग दाखवतील असं त्याला वाटलं. पण झालं उलटं. अरस्तू म्हणाले की, असं असेल तर तू मरायला हवं. नैराश्यात जगणाऱ्या, नकारात्मक वृत्ती बाळगणाऱ्या माणसांचं जगणं मृत्यूपेक्षाही वाईट असतं. त्यामुळे तू जगून काहीही फायदा नाही. आयुष्यात कायम सकारात्मक विचार अंगी बाणवायला हवा. आशावादी मनुष्याची प्रगती होते. आशावाद म्हणजे माणसाचा मानसिक सूर्योदय. तुझ्यात आशावाद नसेल तर



जगण्याला काहीच अर्थ नाही. हे ऐकून त्या व्यक्तीने बोध घेतला आणि आयुष्य आनंदाने जगण्याचं ठरवलं.

मुन्शी प्रेमचंद म्हणतात, जीवनात अनेक बरे-वाईट प्रसंग येत असतात. निराशेतही आशा दिसते. निराशेवर विजय मिळवून आयुष्याला त्याचा खरा अर्थ देण्याचा प्रयत्न करा. सत्कर्म करत राहा. निवडलेल्या मार्गावर चालत राहा.

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपण निराशावाद सोडायला हवा. औदासीन्य, निराशा ही आयुष्याची प्रतिकं नाहीत. परोपकार करून आनंद मिळवणं हा जीवनाचा खरा उद्देश आहे. बिकट प्रसंगांना घाबरून निराशावादी वृत्ती जोपासली तर आपण आपलं आणि इतरांचं भलं करू शकणार नाही. त्यामुळे आशावाद हेच सुखी आयुष्याचं गमक आहे.

• शिकवण •

## दुर्भाग्याची लक्षणं

आर्य चाणक्याने दुर्भाग्याची काही लक्षणं सांगितली आहेत. त्याविषयी...


चाणक्य सांगतात की, कष्टं च खलु मूर्खत्त्वं, कष्टं च खलु यौवनम।
कष्टात कष्टतरं चैवे परगेहे निवासनम।।

याचा अर्थ असा की मूर्ख आणि अज्ञानी असणं ही कोणत्याही व्यक्तीसाठी दुर्भाग्याची गोष्ट असते. मूर्ख माणसाला आयुष्यात कधीही सुख मिळत नाही. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर त्याला दु:ख आणि अपमानच सहन करावा लागतो.

• चाणक्यनीती •

* दुसऱ्यांच्या घरात राहिल्याने आपला अपमान होतो. तसंच स्वातंत्र्य संपतं. आपण मनासारखं काहीही करू शकत नाही. त्यामुळे स्वत:च्या हक्काच्या घरात राहायला हवं. परक्याच्या घरात राहणं दुर्दैवी असतं.

* तारूण्यात धैर्य नसणं ही हे माणसाचं सर्वात मोठं दुर्दैव मानलं जातं. तारूण्यात खूप राग येतो. स्वत:वर नियंत्रण राहात नाही. यामुळे आपलं स्वत:चंच नुकसान होऊ शकतं. त्यामुळे ऐन उमेदीच्या काळात धीर सोडता कामा नये.



## कामावर श्रद्धा हवी

पैसा, मौल्यवान भेटवस्तू यांपेक्षाही आपल्या कामावर श्रद्धा असणं गरजेचं आहे. कामाप्रती प्रामाणिक राहिल्याने आपल्याला मान-सन्मान मिळतो. इतकंच नाही तर आपल्या निष्ठेचंही कौतुक होतं. राजच्या दरबारी असलेल्या बहुरूप्याकडून आपण हे शिकू शकतो. त्याचीच ही कथा. राजाच्या दरबारात एक बहुरूपी वेगवेगळी सोंगं करून, वेष बदलून सर्वांची करमणूक करत असे. यामुळे राजाकडून त्याला भरपूर बक्षिसं मिळत असत. एके दिवशी राजाने त्याला वेगळं सोंग घ्यायला सांगितलं. राजा म्हणाला की, कोणीही तुला ओळखू शकणार नाही असं सोंग घे. तू हे केलं तर मी १०० सुवर्णमुद्रा भेट देईन. हे एकून बहुरूप्या निघून गेला.

दुसऱ्या दिवशी नगराच्या बाहेर असलेल्या एका झाडाखाली त्याने बैठक मांडली. कपडे उतरवून शरीरावर भस्म लावलं. मौनव्रत स्वीकारलं. धूप लावून तपश्चर्या करू लागला. तिकडे नगरात कोणीतरी महान साधू आल्याची वार्ता पसरली. लोक या साधूच्या दर्शनासाठी धावले. या साधूला दिलेल्या देणग्या, भेटवस्तू तो इतरांमध्ये वाटून टाकत असे. त्याची किर्ती राजाच्या कानांपर्यंतही पोहोचली. राजा त्याला भेटायला आला. सोबत त्याने बऱ्याच भेटवस्तूही आणल्या होत्या. राजाने त्या साधूला



गुरूस्थानी मानलं. या भेटवस्तू त्याने लोकांना देऊन टाकल्या. दुसऱ्या दिवशी हा बहुरूप्या. दरबारात आला. सुवर्णमुद्रांची मागणी केली. राजाने कारण विचारलं. त्यावर तो म्हणाला की महाराज, काल ज्याला तुम्ही गुरु मानलं तो मीच होतो. राजाला आश्चर्य वाटलं. त्याने १०० सुवर्णमुद्रा दिल्या.

• बोधकथा •

तू इतरांच्या आणि माझ्या भेटवस्तू का स्वीकारल्या नाही, असा प्रश्न राजाने त्याला विचारला. यावर तो म्हणाला की, लोक श्रद्धेने माझ्याकडे आले होते. मी या भेटी स्वीकारल्या असत्या तर त्यांचा साधूंवरचा विश्वास उडाला असता. इतर साधूंनाही लोकांनी संशयाच्या नजरेने पाहिलं असतं. साधू या पदाची प्रतिमा मलीन झाली असती. त्यामुळे मी या भेटवस्तू लोकांमध्ये वाटून टाकल्या आणि माझं बक्षिस घ्यायला आलो. माझी माझ्या कामावर आणि कौशल्यावर श्रद्धा आणि विश्वास आहे. यामुळे राजा खूश झाला आणि त्यांचं तोंडभरून कौतुक केलं.

# महायुतीतून अजित पवारांची राष्ट्रवादी गायब!

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :

नागपूरसह राज्यभरात महानगरपालिकांची रणधुमाळी सुरू असली तरी, अजित पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीमधून गायब झाल्याचे चित्र आहे. नागपूर महापालिकेचा रणसंग्राम रंगात येत असून, नागपूर शहरभर भाजपाचे मोठमोठे होर्डिंग्ज लागले आहेत. विकासाची दिसतेय गती.. म्हणून विश्वासाची भाजपा-महायुती.. असा ठळक मजकूर या होर्डिंग्जवर असून त्यात केवळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे छायाचित्र आहे. यातून दादांना डच्चू देण्यात आल्याचे स्पष्ट दिसून येते.




काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेत सत्तेत असलेल्या भाजपवर जोरदार हल्ला चढवला होता. भाजपच्या स्थानिक नेत्यांना भ्रष्टाचाराची राक्षसी भूक लागली आहे. सध्या लुटारूची टोळी निर्माण झाली आहे. दिवसाढवळ्या दरोडे टाकले जात आहे, अशी बोचरी टिका केली होती. यानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ह्यअपने गिरेबान में झांको, बोललो तर अडचण होईल, असे प्रत्युत्तर दिले होते.

यात भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही ह्यदमात घेऊ नका, हलक्यात पण घेऊ नका दम देणाऱ्यांनी विचार करून काम करावे, असे अजित पवार यांना सुनावले. यावरून महायुतीत चांगलेच बिनसल्याचे दिसते.

भाजप नेते व मंत्री आशिष शेलार यांनी आम्ही आणि आमचा पक्ष सावरकरांच्या विचारांवर चालणारे आहोत. त्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षालासुद्धा सावरकरांचे विचार मान्य करावेच लागतील, असे म्हटले होते. त्यामुळे महायुतीत मिठाचा खडा पडल्याचे दिसून येत आहे. आता महायुतीच्या राज्यभरात दिसणाऱ्या एका जाहिरातीतून उपमुख्यमंत्री अजित पवारांचा फोटो नसल्याने राज्यभरात कार्यकर्त्यांत संभ्रम निर्माण झाला आहे. अजित पवार महायुतीत आहे की बाहेर, असा प्रश्न कार्यकर्ते विचारत आहे.

सध्या महापालिका निवडणुकीसाठी प्रचाराला वेग आला आहे. पारंपरिक पद्धतीने प्रचार सुरू असताना विविध इलेक्ट्रॉनिक माध्यमातून महायुतीची एक जाहिरात राज्यातील प्रत्येकच कार्यकर्ता ही जाहिरात बघत आहे. विकासाची माहिती देणाऱ्या या जाहिरातीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे फोटो ठळकपणे दिसत आहे तर देशाचे गृहमंत्री अमित शाह, भाजपचे वरिष्ठ नेत्यांशिवाय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शिवसेनेच्या नेत्यांचे फोटो आहेत. परंतु यात उपमुख्यमंत्री अजित पवारांचा फोटो दिसत नसल्याने कार्यकर्त्यांपुढे प्रश्न निर्माण झाला आहे.

अजित पवारांची राष्ट्रवादी इतर ठिकाणी महायुतीविरोधात लढत आहे, त्यामुळे अजित पवार यांचा फोटो नसल्याचे सांगण्यात येते.

# काँग्रेस नेते हिदायत पटेल यांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ७ :



राजकीय पूर्ववैमनस्यातून अकोट तालुक्यात काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष हिदायत पटेल यांचा अखेर मृत्यू झाला. बुधवारी दुपारी मोहाळा येथे नमाज पठणानंतर मशिदीबाहेर चाकूने प्राणघातक हल्ला झाल्यानंतर गंभीर जखमी अवस्थेत त्यांना अकोला येथील ओझोन हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान आज पहाटे त्यांचा मृत्यू झाला.

हिदायत पटेल हे माहोळ गावात असताना काही हल्लेखोरांनी त्यांना घेरले आणि धारदार शस्त्रांनी त्यांच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात पटेल यांच्या पोटावर आणि मानेवर खोलवर जखमा झाल्या आहेत. भरदिवसा झालेल्या या हल्ल्यामुळे परिसरात मोठी पळापळ झाली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पटेल यांना तातडीने अकोट येथील रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, अतिरक्तस्राव आणि जखमांचे गांभीर्य लक्षात घेता, प्राथमिक उपचार करून त्यांना तातडीने अकोला येथील मोठ्या रुग्णालयात हलवण्यात आले होते. दरम्यान उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

२४ मे २०१९ रोजी लोकसभा निवडणुकीदरम्यान मोहाळा येथे भाजप अल्पसंख्याक सेलचे माजी पदाधिकारी मतीन शेरखाँ पटेल (५८) यांची हत्या झाली होती. या प्रकरणी हिदायत पटेल यांच्यासह दहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून, त्याची सुनावणी सुरू आहे.

त्यामुळे आपल्या काकाच्या हत्येचा बदला घेण्याच्या उद्देशातून हिदायत पटेल यांच्यावर मृत मतीन पटेल यांचा पुतण्या उबेद पटेल याने चाकूने हल्ला केल्याची घटना घडल्याची माहिती गावातील काही प्रत्यक्षदर्शींकडून मिळाली. आमचा त्या दिशेने तपास सुरू आहे, असे अकोट पोलिसांनी सांगितले.

हिदायत पटेल यांच्यावर हल्ला झाल्याचे वृत्त पसरताच अकोला आणि अकोटमधील काँग्रेस कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रुग्णालयाबाहेर गर्दी केली. कार्यकर्त्यांमधील संताप आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी अकोला शहरासह माहोळ गावात कडक पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

हिदायत पटेल हे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आणि अकोला जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते. त्यांनी २०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणूक लढवली. अकोला जिल्ह्यातील काँग्रेसचा एक आक्रमक आणि महत्त्वाचा चेहरा म्हणून हिदायत पटेल यांची ओळख आहे.

# राणांचा पाठिंबा.. बोंडेंचा खुलासा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ७ :

महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू असताना वेगवेगळे रंग देखील अनुभवायला मिळत आहेत.

भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी साईनगर प्रभागातील भाजपचे उमेदवार तुषार भारतीय यांच्या विरोधातील युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार सचिन भेंडे यांना उघडपणे पाठिंबा दिल्यानंतर आता त्यांनी विलासनगर-मोरबाग प्रभागातील युवा स्वाभिमान पक्षाच्या एका उमदेवाराच्या प्रचारार्थ सभा घेतल्याने भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. अखेर भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांना यांसदर्भात खुलासा करावा लागला आहे.



विलासनगर प्रभागाच्या ड जागेवरील भाजपचे उमेदवार राजेश साहू यांच्या ऐवजी युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार दीपक साहू सम्राट यांना निवडून आणण्याचे आवाहन नवनीत राणा यांनी आमदार रवी राणा यांच्या उपस्थितीत केले.

दुसरीकडे, त्यांनी याच प्रभागातील भाजपच्या इतर तीन उमेदवारांना निवडून आणा असेही सांगितले. विशेष म्हणजे हे उमेदवारही युवा स्वाभिमान पक्षाच्या मंचावर उपस्थित होते. प्रभागातील भाजपच्या एका उमेदवाराला विरोध करण्याचे राजकारण काय, अशी चर्चा त्यानंतर सुरू झाली. याला लोकसभा निवडणुकीची पार्श्वभूमी असल्याचे सांगितले जात आहे. आपल्याला पराभूत करण्यासाठी कारणीभूत ठरलेल्यांना धडा शिकवा, असा नाराच नवनीत राणा यांनी दिला आहे.

# फसवणूकीत ६०६ कर्मचाऱ्यांचाही सहभाग

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

## एसबीआयमधील २२२ कोटींचा मामला

भारतीय स्टेट बँकेतील फसवणुकीचे प्रमाण मागील काही वर्षांत कमी होत असले, तरी बँकेतीलच कर्मचाऱ्यांचा सहभाग असलेल्या फसवणुकीची आकडेवारी धक्कादायक आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या २२ महिन्यांच्या काळात बँकेच्या देशभरातील शाखांमध्ये झालेल्या एकूण फसवणुकींपैकी २२२.२४ कोटी रुपयांच्या फसवणुकीत बँकेतील ६०६ कर्मचाऱ्यांचा सहभाग आढळून आल्याची माहिती माहिती अधिकारातून उघड आहे.

एसबीआयमधील फसवणुकीचे प्रमाण मागील काही वर्षांत घटत असल्याचे चित्र असले, तरी रक्कम आणि प्रकरणांची संख्या लक्षणीय आहे. १ जानेवारी २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१ या कालावधीत एसबीआयच्या देशभरातील शाखांमध्ये १,३४० प्रकरणांत ६,०६७.९६ कोटी रुपयांची फसवणूक झाली होती.

२०२२ मध्ये १,५४६ प्रकरणांत ५,६०३.२६ कोटी, २०२३ मध्ये ९४७ प्रकरणांत १,६३३.३२ कोटी, २०२४ मध्ये ३,०१० प्रकरणांत २,९८४.८३ कोटी, तर १ जानेवारी २०२५ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत २,०९५ प्रकरणांत १,७९३.८१ कोटी रुपयांची फसवणूक झाली आहे.

ही बाब सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहिती अधिकाराच्या माध्यमातून पुढे आणली आहे. दरम्यान, १ जानेवारी २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत बँकेतील एकूण फसवणूक प्रकरणांपैकी २२२.२४ कोटी रुपयांच्या फसवणुकीत बँकेच्या कर्मचाऱ्यांचा थेट सहभाग आढळल्याची माहिती एसबीआयचे केंद्रीय जनमाहिती अधिकारी राकेश ऐमा यांनी माहिती अधिकारांतून अभय कोलारकर यांना दिली आहे.

एसबीआयमध्ये १ जानेवारी २०२४ ते ३१ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत एकूण १५,९५६ प्रकरणांत ११८.४७ कोटी रुपयांची फसवणूक झाली. यामध्ये ६२.३७ कोटी रुपयांची ऑनलाईन फसवणूक, मोबाईल बँकिंगद्वारे ३.२३ कोटी रुपयांची फसवणूक तसेच एटीएमद्वारे ७.०६ कोटी रुपयांच्या फसवणुकीचा समावेश आहे.

देशातील विविध राज्यांपैकी पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक सायबर फसवणूक झाली असून, १,८३८ प्रकरणांत १२.६० कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचेही माहिती अधिकारातून पुढे आले आहे.


**फसवणुकींचे प्रकार**

एखाद्याच्या नावाने बनावट व्यक्ती उभी करून बँकेतून कर्ज उचलणे, खोटे ताळेबंद किंवा बनावट आयकर विवरणपत्र दाखवून कर्ज घेणे, एकाच मालमत्तेवर अनेक बँकांकडून कर्ज उचलणे, बँक खाते हॅक करून सायबर फसवणूक करणे, तसेच अन्य विविध पद्धतींनी बँकांची फसवणूक होत असल्याचेही समोर आले आहे.

# हिदायतच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्या..

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ७ :

## हर्षवर्धन सपकाळ यांची मागणी



राज्यात कोयता गँग, ड्रग्ज माफिया, रेती माफिया, लँड माफिया, आका यांचे पेव फुटले आहे.गावागावात गुन्हेगारीचे लोण पसरले असून अकोल्यातील काँग्रेस नेते हिदायत पटेल यांची झालेली हत्या हे राज्यातील कायदा सुव्यवस्था किती रसातळाला गेली आहे, याचे उदाहरण आहे. राज्याला पूर्ण वेळ गृहमंत्री नसल्याचा हा परिणाम आहे, असा आरोप करून या हल्लयातील सर्व गुन्हेगारांना तातडीने अटक करून कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

ते पुढे म्हणाले की, ही निवडणूक अमरावती महानगरपालिकेची जशी आहे तशीच राज्यातील इतर २९ महानगरपालिकेची आहे. नगरपालिका, नगरपंचायत निवडणुकीत पैसा फेक तमाशा देख, हे वगनाट्य सत्ताधारी पक्षाकडून खेळले गेले. कायदा सुव्यवस्था गुंडाळून ठेवली आहे, निवडणूक आयोग सत्ताधारी पक्षांच्या हाताचे खेळणे बनून राहिला आहे, प्रशासन सत्ताधाऱ्यांना मदत करत आहे. बोगस मतदान, पैशाचे प्रचंड वाटप सुरु आहे. राज्यात प्रशासन नावाचे काही चालत नाही. जे नगरपालिका निवडणुकीत झाले तेच महानगरपालिका निवडणुकीत होत आहे.

घोडेबाजाराला ऊत आला असून अर्ज मागे घेण्यासाठी विरोधी पक्षांच्या उमेदवारांना धमकावले जात आहे, दबाव आणला जात आहे. बिनविरोध निवडीसाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री गुंडगिरीवर उतरले आहेत. विधानसभेचे अध्यक्ष संविधानाचे, सभागृहाचे कस्टोडीयन आहेत पण त्यांच्या घरातील तीन उमेदवार बिनविरोध व्हावे यासाठी ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या कार्यालयासमोर उभे होते, त्यांनी दमदाटची केली,धमक्या दिल्या, त्यांचे वागणे विकृत होते. सत्ताधारी पक्षाने लोकशाही गुंडळून ठेवली आहे.

भारतीय जनता पक्ष व एमआयएम हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. माजी मुख्यमंत्री व भाजपा नेते अशोक चव्हाण हे एमआयएमला उमेदवारी देण्यास सांगत आहेत. एमआयएम ही भाजपीची बी टीम आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# लोकजागर

# रोजगार, जलसुरक्षितेसाठी मिशन जलबंधू





नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः अक्राणी आणि अक्कलकुवा या तालुक्यांतील पाण्याची टंचाई असणाऱ्या गावांना लोकसहभागाने जल आत्मनिर्भर करणे हे मिशन जलबंधू अभियानाचा प्राधान्यक्रम आहे. विविध शासकीय विभाग आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मिशन जलबंधू उपक्रमाने आकार घेतला आहे. याचे चांगले परिणाम जल, मृद्संधारणाच्या दृष्टीने दिसून येत आहेत. १९६१ मध्ये धुळे आणि जळगाव हे खानदेश म्हणून ओळखले जात असत. १९९८ मध्ये धुळे जिल्ह्याचे विभाजन होऊन नंदुरबार हा जिल्हा नव्याने निर्माण झाला.

हा जिल्हा आदिवासी बहुल असून त्याची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार सुमारे १६.९८ लाख इतकी आहे. जिल्ह्यात सुमारे ७० टक्के आदिवासी समाज वास्तव्य करून असतो.जिल्ह्यात नवापूर नंदुरबार, शहादा, अक्राणी (धडगाव), तळोदा आणि अक्कलकुवा हे तालुके आहेत. यांपैकी अक्कलकुवा आणि अक्राणी ही दोन तालुके सातपुडा डोंगराच्या कुशीत आहेत. तळोदा, अक्कलकुवा या तालुक्यात थोडा अधिक पाऊस पडतो.बव्हंशी पाड्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते.

मार्च, एप्रिलपासून पिण्याच्या पाण्याची टंचाई बहुतेक सर्व पाड्यांवर असते. तथापि, काही पाड्यांवर फेब्रुवारी महिन्यापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. ही सर्व गावे डोंगर माथ्यावरच आहेत., जनावरांना देखील रानावनात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवते. प्रत्येक कुटुंबाकडे पशुधन आहे. गावरान गाई, शेळ्या मोठा प्रमाणावर असल्याने त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न देखील गंभीर होतो. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी पुढाकार घेतला आहे.

चंद्रपूर, मेळघाट अन्य ठिकाणच्या आदिवासी क्षेत्रात काम केल्याचा अनुभव त्यांना आहे. १ मे २०२५ पासून त्यांनी जिल्ह्यात मिशन जलबंधू हे अभियान हाती घेतले आहे.. दरवर्षी सुमारे जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यात पाण्याचा टँकर सुरू करावा लागत असे. तथापि तेथील गावकऱ्यांनी पुढाकार घेऊन गाव टँकरमुक्त केले. त्याच धर्तीवर मनखेडी ग्रामपंचायत अंतर्गत चालीर्चा पाडा आणि डोमखेडी ग्रामपंचायती अंतर्गत तिनसमाल ही गावे हरित रोजगार आणि जलस्वयंपूर्ण गाव या उपक्रमांतर्गत सहभागी झाली आहेत. या उपक्रमामध्ये नदी की पाठशाला आणि नॅचरल सोल्यूशन्स या स्वयंसेवी संस्थांचाही चांगला सहभाग मिळाला आहे.

नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः अक्राणी आणि अक्कलकुवा या तालुक्यातील पाण्याची टंचाई असणाऱ्या गावांना लोकसहभागाने जल आत्मनिर्भर करणे हे या अभियानाचा प्राधान्यक्रम आहे. यासाठी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी अक्राणी तालुक्यातील सुमारे १०० गावे या अभियानासाठी निवडलेली आहेत. राज्यातील कोणत्याही आदिवासी बहुल जिल्ह्यातील हा पहिला प्रामाणिक प्रयत्न आहे.

याच्या यशस्वितेवर संपूर्ण राज्यात अशा प्रकारचे कामे करता येतील अशी प्रशासनाला आशा आहे.पहिल्या टप्प्यात अक्राणी तालुक्यातील २० गावे आणि अक्कलकुवा तालुक्यातील ५ गावे निवडली आहेत. नंदुरबार जिल्हा नीति आयोगाच्या आकांक्षित कार्यक्रमाचा हा भाग आहे. जिल्ह्यातील पाणी आणि पाण्यासाठी काम करणा?या सर्व विभागांना एकत्र करून डॉ. मिताली सेठी यांनी दिशा दिली. विशेषतः जलजीवन मिशन, जलसंपदा विभाग, जलसंधारण विभाग, भूजल सर्व्हेक्षण विकास यंत्रणा या विभागांना एकत्र करून प्रत्येक गावाचे शास्त्रीय आराखडे करावयाची जबाबदारी दिली आहे, आणि त्यानुसार उपचारांची दिशा ठरविण्यासाठी निर्देश दिले.ग्रामपंचायत ही महत्त्वाची स्थानिक स्वराज्य संस्था आहे. गाव स्तरावर पेसा, ग्रामपंचायत विकास आराखडा, महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना इत्यादी कार्यक्रमांची अंमलबजावणी करते, म्हणून गाव स्तरावर ग्रामसभेमार्फत किमान १० जलबंधू निवडून त्यांच्या क्षमता बांधणी करून त्यांच्यात कौशल्यवृद्धी करणे आणि त्यायोगे संबंधित गावाच्या पाडानिहाय नियोजन करण्यात येणार आहे. जलबंधू निवडीमध्ये पुरुष आणि महिलांचा सहभाग घेण्यात आला आहे.

■ ■ ■

## अद्रक शेतीतून लाखोंचे उत्पन्न घेणाऱ्या युवा शेतकऱ्याची यशोगाथा



आजच्या तरुण पिढीत उच्च शिक्षण घेतल्यानंतर नोकरीच्या मर्यादित संधींमुळे निराशा पसरताना दिसते. अशाच परिस्थितीतून जालना जिल्ह्याच्या बदनापूर तालुक्यातील मांडवा गावचे नारायण चंद या तरुणाने वेगळा मार्ग निवडला.

त्यांनी केवळ दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न प्राप्त करून सिद्ध केले की योग्य दृष्टिकोन आणि कठोर परिश्रम असल्यास शेती ही केवळ जीवननिर्वाहाचे साधन न राहता समृद्धीचा मार्ग बनू शकते. नारायणच्या या यशस्वी प्रयोगाने अनेक तरुण शेतकऱ्यांसाठी नवीन दिशा उमलली आहे. नारायण चंद यांनी पाच वर्षे एमपीएससीची तयारी केली परंतु अपेक्षित यश मिळाल्याशिवाय त्यांना नोकरीच्या मागे लागण्याऐवजी शेतीकडे वळण्याचा निर्णय घ्यावा लागला.

त्यांनी केवळ दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न कमावून दाखवून शेतीक्षेत्रातील नवीन शक्यता उघडल्या आहेत. नारायण चंद यांनी त्यांच्या शेतीच्या प्रयोगासाठी आधुनिक शास्त्रीय पद्धतींचा अवलंब केला. अद्रक लागवड करण्यापूर्वी जमिनीत युरिया, डीएपी आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांचा संतुलित डोस दिला जातो. निंबोळी पेंड, कार्बोफेरम आणि ट्रायकोडर्मा यांसारखे जैविक उपाय वापरून अळी व कीड रोगांवर नियंत्रण मिळवण्यात त्यांना विशेष यश आले. या सर्व पद्धतींनी त्यांना दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न मिळवण्यास मदत केली.

शेतीतील यशासाठी रासायनिक आणि जैविक पद्धतींचे समतोल जपणे गरजेचे आहे हे त्यांनी प्रत्यक्षात सिद्ध केले.

सुरुवातीच्या टप्प्यात आलं पिकावर अळी आणि करपा रोगांचा प्रादुर्भाव दिसून आल्याने नारायण यांना काही अडचणी निर्माण झाल्या. यावर मात करण्यासाठी त्यांनी ॲन्टिबायोटिक आणि बुरशीनाशकांचा योग्य वापर करून रोगांवर नियंत्रण मिळवले. सड रोग रोखण्यासाठी त्यांनी कृषी विद्यापीठाने शिफारस केलेली औषधे आणि ट्रायकोडर्मा वापरली. या सर्व प्रयत्नांनी दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न मिळविण्याचे त्यांचे ध्येय साध्य केले.

कीटक आणि रोग नियंत्रणासाठी सतत सजगता ठेवणे गरजेचे आहे हे त्यांच्या अनुभवातून स्पष्ट झाले..नारायण चंद यांचे यश केवळ आर्थिक दृष्ट्या महत्त्वाचे नाही तर ते तरुण शेतकऱ्यांसाठी एक मोठी प्रेरणादायी कहाणी बनली आहे. त्यांनी सिद्ध केले की लहान जमिनीतूनही मोठे उत्पन्न मिळवणे शक्य आहे. दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न हे केवळ एक आकडा नसून तरुण पिढीकडे शेतीक्षेत्रातील अपार संधींचे दर्शन घडविणारे सूचक आहे.

नारायणच्या यशाने ग्रामीण भागातील अनेक तरुणांमध्ये नवीन आत्मविश्वास निर्माण झाला आहे आणि त्यांनी आता शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहायला सुरुवात केली आहे.दोन एकर आल्याच्या शेतीतून १५ लाखाचे उत्पन्न हे केवळ नारायणचे यश नसून ते संपूर्ण शेतकरी समुदायासाठी एक आदर्श ठरले आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# खोडा घालणाऱ्यांना दाखवला जोडा

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. ७ :

## एकनाथ शिंदेंची टीका



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर ती बंद पाडण्यासाठी विरोधकांनी प्रयत्न सुरू केले. पण, योजनेत खोडा घालणाऱ्यांना लाडक्या बहिणींनी चांगलाच जोडा दाखवला. विधानसभा निवडणुकीत कमी जागा लढूनही शिवसेनेचे ६० आमदार निवडून आले. ज्या उमेदवारांच्या पाठीशी महिला, त्याचा नंबर पहिला हेच विजयाचे सूत्र आहे, असा दावा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी येथे केला. नेहरू मैदानावर प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत होते.

शिंदे म्हणाले, मी स्वतः गरिबी पाहिली आहे. एका शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. घरखर्च भागवण्यासाठी आईची तगमग, काटकसर पाहिली आहे. बहिणींना सरकारच्या माध्यमातून मदत करण्यासाठी मी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली. काही लोक योजना बंद पाडण्यासाठी न्यायालयात गेले. खोडा घातला, त्यात आडवे पडले. या योजनेत खोडा घालणाऱ्यांना लाडक्या बहिणींनी जोडा दाखवला आणि घरी बसवून दिले. म्हणून कुणीही आला, तरी लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. हा तुमच्या भावाचा शब्द आहे. जे बोलतो, ते करतो आणि जे नाही बोलत ते पण करतो. कमी बोलतो जास्त काम करतो. अयोध्येमध्ये प्रभू श्रीरामांचे मंदिर साकार झाले, बाळासाहेब ठाकरे यांचे स्वप्न साकार झाले.

शिंदे म्हणाले, शिवसेनेला काँग्रेसच्या दावणीला बांधण्याचे पाप उद्धव ठाकरे यांनी केले, तेव्हा उठाव करणारा भाऊ या महाराष्ट्राने, देशाने पाहिला. लोकांनी देखील स्वीकारला. नगरपालिका निवडणुकांमध्ये आपले ७० नगराध्यक्ष निवडून आले आहेत. कमी जागा लढलो, तरी जास्त जागांवर निवडून आलो. मला काय मिळाले, यापेक्षा सर्वसामान्य लोकांना काय मिळाले, याचा विचार करणारे आम्ही लोक आहोत.

# मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरेच....

■ वृत्तसंस्था
धाराशिव, दि. ७ :

## राजू शेट्टींचा ठाकरे बंधूंना पाठिंबा



मराठी माणसाच्या भल्यासाठी मुंबईत ठाकरेच विजयी व्हावेत, आमची त्यांना सहानुभूती असल्याचे विधान शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे.

महाराष्ट्राच्या हक्काचे किती प्रकल्प गुजरातला पाठवले याची माहिती घ्यावी, म्हणजे मुख्यमंत्र्यांचे मराठीवरील प्रेम दिसून येईल, असा टोलाही शेट्टी यांनी लगावला आहे. धाराशिव येथे शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात झालेल्या आंदोलनानंतर राजू शेट्टी माध्यमांशी बोलत होते.

आगामी महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय पक्षांचे प्रचार सुरू झाले आहेत. तसेच राजू शेट्टी यांनी महाराष्ट्रातील इतर ठिकाणी काँग्रेसला पाठिंबा दिला असला तरी मुंबईत मात्र त्यांनी ठाकरेंना पाठिंबा दिल्याचे पाहायला मिळत आहे. आमचे वैचारिक मतभेद असले तरीही मुंबईत मराठी माणसाच्या भल्यासाठी ठाकरे बंधूच विजयी व्हावेत, असे राजू शेट्टी म्हणाले.

मुंबईवर, मराठी माणसावर प्रेम आहे, त्यांच्या विकासासाठी आपण प्रयत्न करत आहोत असा दावा मुख्यमंत्र्यांनी केला. यावर प्रतिक्रिया देताना राजू शेट्टी म्हणाले, महाराष्ट्राच्या हक्काचे प्रकल्प गुजरातला किती पाठवले त्याची माहिती घ्या म्हणजे त्यावरून मराठीवर मुख्यमंत्र्यांचे प्रेम दिसून येईल, असा टोला शेट्टी यांनी लगावला आहे. दरम्यान, राजू शेट्टी यांनी शक्तिपीठ महामार्गाला विरोध दर्शवला असून त्यांनी आज आंदोलनात भाग घेतला.

# २६ जहाल नक्षल्यांची पोलिसांसमोर शरणागती!

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ७ :




छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात ७ जानेवारी रोजी सकाळी २६ जहाल नक्षलवाद्यांनी पोलिसांसमोर शरणागती पत्करली. यात ६५ लाखांचे बक्षीस असलेल्या १३ जहाल नक्षलवाद्यांचा समावेश असून, नक्षली चळवळीला मोठा हादरा बसला आहे.

आत्मसमर्पण केलेल्या २६ नक्षलवाद्यांमध्ये ७ महिला कॅडर्सचा समावेश आहे. कंपनीची समिती सदस्य लाली ऊर्फ मुचाकी आयते लखमू (३५) हिनेही शस्त्र खाली ठेवले. २०१७ मध्ये ओडिशातील कोरापूट रोडवर पोलिसांचे वाहन आयईडी स्फोट घडवून उडविले होते, यामागे लाली ही मास्टरमाईंड होती. यासोबत हेमला लखमा (४१), अस्मिता उर्फ कमलू सन्नी (२०), रामबती उर्फ पदम जोगी (२१), सुंदर पाले (२०) यांचाही समावेश आहे.

हे सर्वजण गेल्या अनेक वर्षांपासून विविध हिंसक कारवायांमध्ये सक्रिय होते. मात्र, शासनाच्या पुनर्वसन धोरणामुळे प्रभावित होऊन त्यांनी मुख्य प्रवाहात येण्याचा निर्णय घेतला. जिल्हा मुख्यालयी पोलिस अधीक्षकांसमोर त्यांनी आपली शस्त्रे खाली ठेवून शांततेचा मार्ग स्वीकारला.

एकाच वेळी २६ नक्षलवादी शरण आल्यामुळे पोलिसांच्या हाती महत्त्वाची माहिती लागण्याची शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत झालेल्या मोठ्या नक्षली हल्ल्यांचे नियोजन आणि त्यातील सहभागी नेत्यांची माहिती यातून समोर येऊ शकते. या ऐतिहासिक आत्मसमर्पणानंतर नक्षली चळवळीची ताकद मोठ्या प्रमाणावर क्षीण झाल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात आहे. सुकमा पोलिसांकडून नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ह्यपुना मारगेमह्ण (नवी पहाट) ही विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमेअंतर्गत नक्षलवाद्यांना हिंसेचा मार्ग सोडण्याचे आवाहन केले जाते. या मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळेच इतक्या मोठ्या संख्येने नक्षलवादी शरण येत असल्याचे बोलले जात आहे.